





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०९.०३.२०२६ | अंक नं. २८१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













## 'भारतीय शेअर बाजारा'मध्ये झाली मोठी घसरण; सेन्सेक्स २४०० तर निफ्टी ७०० अंकांनी कोसळला

मुंबई - जागतिक स्तरावर वाढत्या तणाव आणि विक्रीच्या प्रचंड दबावामुळे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी ९ मार्च रोजी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सुरुवातीच्या व्यापारात मुख्य निर्देशांक कोसळले. गेल्या आठवड्यातील मोठ्या पडझडीनंतर मुंबई शेअर बाजार, बीएसई सेन्सेक्स, आठवड्याच्या पहिल्या ट्रेडिंग दिवशी, मागील बंदच्या तुलनेत २४०० अंकांपेक्षा जास्त कोसळला तर एनएसई निफ्टीने ७०० अंकांपेक्षा जास्त घसरणीसह व्यवहार सुरू केला. यामुळे गुंतवणूकदारांचे १५ लाख कोटींचे नुकसान झाले आहे.

दुसरीकडे, व्यापक बाजारातही पडझड होताना दिसत आहे. निफ्टी मिडकॅप २.५४ टक्के आणि निफ्टी स्मॉलकॅप २.५१ टक्क्यांनी खाली आला असून क्षेत्रीय आघाडीवर निफ्टी पीएसयू बँकला सर्वाधिक ४ टक्क्यांहून अधिक तोटा झाला. निफ्टी बँक आणि निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्येही घसरण झाली असून कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे जागतिक चलनवाढीचा धोका वाढला परिणामी, आशियाई बाजार देखील सुरुवातीच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणात विक्री दिसून आली.

भू-राजकीय अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर अनेक गुंतवणूकदार बाजारातून बाहेर पडत आहेत पण, आश्चर्य म्हणजे की बाजारात पडझड होताना सोने आणि चांदीच्या दरातही पडझड होत आहे. त्यामुळे आता गुंतवणूकदारांची कमाई नेमकी कुठं सुरक्षित आहे असा प्रश्नचिन्ह आहे. सोमवारी बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे काही मिनिटांत सुमारे १५ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

### सेन्सेक्स-निफ्टी उघडताच कोसळले

सोमवारी, आठवड्याच्या पहिल्याच दिवशी, व्यवहाराच्या सुरुवातीला बीएसई सेन्सेक्स ७७,०५६.७५ वर उघडला, तर काही मिनिटांतच ३० शेअर्सचा निर्देशांक २,४०० पेक्षा जास्त अंकांनी घसरून ७६,४२४ वर आपटला. यादरम्यान, एनएसई निफ्टीने २३,८६८ वर ओपनिंग केली असून त्यानंतर सेन्सेक्ससोबतच निफ्टीदेखील ७०० पेक्षा जास्त अंकांनी घसरून २३,६९७ वर पोहोचला. त्याचवेळी, बाजाराच्या सुरुवातीला अमेरिकन डॉलरसमोर भारतीय रुपायाही ४३ अंकांनी घसरून ९२.२५ वर पोहोचला.

याशिवाय सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध सर्वच ३० स्टॉक्समध्ये विक्रीचा सपाटा लागलेला. बाजाराच्या सुरुवातीला इंडिगोचे शेअर्स ५ टक्के पेक्षा जास्त घसरले तर एशियन पेंट्स, एल अँड टी आणि अदानी पोर्ट्सचे शेअर्स ४ टक्के पेक्षा जास्त घसरले. तसेच एसबीआय, मारुती, इटरनल, एचडीएफसी बँक, टाटा स्टील, बजाज फायनान्स, महिंद्रा अँड महिंद्रा, आयसीआयसीआय बँक आणि कोटक महिंद्रा बँक यांचे शेअर्स ३ टक्के पेक्षा जास्त घसरले.




## चार वेगवेगळ्या अपघातांमध्ये महिलेसह चौघांचा दुर्दैवी मृत्यू

### नगर - पुणे महामार्गावर ३ तर कल्याण रोडवर झाला १ अपघात


सागर गुंड (मयत)

नगर - नगर जवळ झालेल्या ४ वेगवेगळ्या अपघातात एका महिलेसह चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यातील ३ अपघात नगर पुणे महामार्गावर तर एक अपघात कल्याण रोड वर झाला आहे. विशेष म्हणजे यातील ३ अपघात एकाच दिवशी ८ मार्च रोजी तर एक अपघात ७ मार्च रोजी सायंकाळी झाला आहे.

पहिला अपघात नगर पुणे रोडवर पवारवाडी घाटाजवळ असलेल्या दौलत पेट्रोल पंपा समोर ७ मार्च रोजी रात्री ८.४५ च्या सुमारास घडला. एका अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत सागर धोंडीबा गुंड (वय ३१, रा. निंबोडी, ता.नगर) हा गंभीर जखमी होवून मयत झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी त्यास उपचारासाठी सुपा येथील रुग्णालयात नेले मात्र डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत सागर याच्या पश्चात आई, पत्नी व एक लहान मुलगी असा परिवार आहे.

दुसरा अपघात ८ मार्च रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नगर पुणे रोड वर चास (ता.नगर) गावच्या शिवारात शेल पेट्रोल पंपाजवळ झाला. पुण्याहून नगरच्या दिशेने मोटारसायकल वर येत असलेल्या प्रवीण आप्पासाहेब बेंद्रे (वय २५, रा. ममदापूर, ता.राहाता) यास भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने धडक दिली. यात तो रस्त्यावर पडून त्याच्या डोक्याला मार लागला. मोठा रक्तस्राव होवून त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

तिसरा अपघात नगर पुणे रोडवरच चास शिवारात असलेल्या हॉटेल माथेरान समोर सायंकाळी ७.३० च्या सुमारास झाला. रस्ता ओलांडत असलेल्या संदीप सुरेश चव्हाण (वय ३६, रा. मांजरी, पुणे) यांना भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने धडक दिली. यात गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### नेप्ती फाट्यावर महिलेचा मृत्यू


सौ. ऐश्वर्या वाकचौरे (मयत)

नगर कल्याण रोड वर नेप्ती फाटा (ता. नगर) येथे मोपेडला भरधाव वेगातील आयशर टेम्पोने धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोपेडस्वार महिलेचा मृत्यू झाला आहे. हा अपघात ८ मार्च रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडला. या मध्ये सौ. ऐश्वर्या सिद्धांत वाकचौरे (वय ३०, रा. नेप्तीनाका, नालेगाव) यांचा मृत्यू झाला आहे.

मयत वाकचौरे या मोपेडवर नगर - कल्याण रोडने नगरकडे येत असताना भरधाव वेगातील आयशर टेम्पोने त्यांच्या मोपेडला जोराची धडक दिली. यात गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर या प्रकरणी अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मयत ऐश्वर्या वाकचौरे यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## महानगरपालिका स्थायी समितीच्या सभापतीपदी सुभाष लोंढे तर महिला-बालकल्याण समिती सभापतीपदी दीपाली बारस्कर

### अर्ज दाखल, अधिकृत निवडींची घोषणा १० मार्चला होणार, उपसभापतीपदी वर्षा सानप





नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी भाजपाचे सुभाष लोंढे तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दीपाली बारस्कर आणि उपसभापतीपदासाठी भाजपच्या नगरसेविका वर्षा सानप यांच्या नावांची ९ मार्चला घोषणा करण्यात आली. या तीनही पदांसाठी प्रत्येकी एक अर्ज दाखल झाल्याने तीनही पदांची बिनविरोध निवड झाली आहे. तथापि अधिकृत घोषणा १० मार्चला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखालील विशेष सभेत होणार आहे.

भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील सत्ता वाटपाच्या सूत्रानुसार स्थायी समितीचे सभापतीपद भाजपकडे, तर महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार भाजप व राष्ट्रवादीकडून या पदाधिकाऱ्यांची नावे सोमवारी जाहीर करण्यात आली. सभापतीपदासाठी सुभाष लोंढे यांच्या अर्जावर सुचक म्हणून मनोज कोतकर तर अनुमोदक म्हणून निखिल वारे यांनी सह्या केल्या आहेत. बारस्कर यांच्या अर्जावर सुचक म्हणून अनिता शेटिया यांचे तर अनुमोदक म्हणून सुनिता कांबळे यांचे नाव आहे. सानप यांच्या अर्जावर सुचक म्हणून वंदना ताठे तर अनुमोदक रोषनी त्रिंबके यांचे नाव आहे. तीनही उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र नगरसचिव मेहेर लहारे यांच्याकडे दाखल केले. यावेळी अनिल मोहिते, बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, महेश लोंढे, पुष्कर कुलकर्णी, शारदा ढवण, विकी जगताप, अजिंक्य बोरकर, सतीश शिंदे, महेश तवले, विजय पठारे यांच्यासह नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

या तीनही पदाधिकाऱ्यांच्या बिनविरोध निवडीची औपचारिक घोषणा मंगळवारी सकाळी ११ वाजता पालिकेच्या सभागृहात होणाऱ्या विशेष सभेत केली जाणार आहे. *(छायाचित्र पान २ वर)*

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# गॅस संपला; बुकींग होईना.. सिलेंडर मिळेना... करायचे कसे, खायचे काय? लोखंडी सिलेंडर देवून प्लास्टिकचा घेण्याची सक्ती, अनामत रकमेचाही भुर्दंड

नगर - गॅस हा जीवनाश्यक वस्तू आहे. मात्र, सध्या गॅस संपला तरीही नवीन सिलेंडर घेण्यासाठी काही एजन्सीकडून १० तर काही एजन्सीकडून १५ दिवसांची अट लावली जात आहे. ऑनलाईन बुकींगचे सर्व पर्याय बंद झाले आहेत. एजन्सीकडूनही नवीन बुकींग घेतले जात नाही. अशा सर्व परिस्थिती ग्राहकांना घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे सिलेंडर मिळेना.. स्वयंपाक करायचा कसा आणि खायचे काय? अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान एजन्सीकडून १४.२ किलोचा एलपीजी लोखंडी सिलेंडर जमा करुन १० किलोचा नवीन प्लास्टिक सिलेंडर घेण्याची सक्ती केली जात आहे. या नवीन प्लास्टिक सिलेंडरसाठीही अतिरिक्त अनामत रक्कम भरण्याची सक्ती केली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या खिशावर आणखी भुर्दंड पडत आहे.

अमेरिका आणि इस्राईलचे इराणविरोधात युद्ध सुरु आहे. परिणामी भारताकडे येणारा इंधन वायू पुरवठा पूर्णपणे थांबला आहे. त्यामुळे घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याचे सांगण्यात येते. गॅस कंपन्यांनी सिलेंडर बुकिंगसाठी निर्बंध लागू केले आहेत. नवीन सिलेंडर बुक करण्यासाठी काही कंपन्यांनी किमान २१ दिवसांचा तर काही ठकाणी हा कालावधी २५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आला आहे. तर एजन्सीकडून ग्राहकांसाठी हा कालावधी ४५ दिवसांचा करण्यात आला आहे. परिणामी गॅस एजन्सीकडे गेल्यानंतर गॅस सिलेंडर देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. याबाबत भारत पेट्रोलियम कंपनीचे जिल्ह्याचे समन्वयक राजेशकुमार मिश्रा यांच्याशी संपर्क साधला असता सर्वत्र गॅस पुरवठा सुरळीत असून अजून टंचाईची परिस्थिती नाही, असे सांगण्यात आले. मात्र, गॅस एजन्सीकडून नागरिकांची हेळसांड करण्याचे प्रकार सुरु आहेत. त्यामुळे अनेक गॅस एजन्सीमध्ये वादाचे प्रसंग उद्‌भवत आहेत. गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकही मेटाकुटीला आले आहेत.

दरम्यान, घरगुती १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीत सुमारे ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे स्थानिक बाजारातही गॅसच्या किमती वाढल्याचे सांगण्यात येते. तथापि, भारत सरकारकडून गॅस टंचाईबाबत अधिकृत काहीही सांगण्यात आले नाही. कंपन्यांचे अधिकारीही टंचाईस दुजोरा देत नाहीत. मात्र, गॅस एजन्सी चालकांकडून ग्राहकांची अडवणूक करुन मनमानी सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे.


## प्लास्टिक सिलेंडरमध्ये गॅस मिळतो, पण लोखंडी सिलेंडर नाही

भारत पेट्रोलियम कंपनीकडून १० किलोचा प्लास्टिक सिलेंडर बाजारात उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अनेक एजन्सीकडून जुना लोखंडी सिलेंडर जमा करुन घेतला जात असून, त्याबदल्यात नवीन प्लास्टिक सिलेंडर दिला जात आहे. विशेष म्हणजे जुन्या लोखंडी सिलेंडरसाठी ग्राहकांकडून अनामत रक्कम भरुन घेण्यात आली होती. तरीही नवीन प्लास्टिक सिलेंडरसाठी पुन्हा अनामत रक्कम भरण्याची सक्ती केली जाते. ज्या ग्राहकांकडे दोन लोखंडी सिलेंडर असतील, त्यांना दोन्ही सिलेंडर जमा करण्याची सक्ती केली जात आहे. या दोन्ही सिलेंडरच्या बदल्यात नवीन एक प्लास्टिक सिलेंडर दिले जाते. जुन्या सिलेंडरची अनामत रक्कमही परत केली जात नाही आणि नवीन प्लास्टिक सिलेंडरसाठी पुन्हा अनामत रक्कम भरण्याची मनमानी गॅस एजन्सीकडून सुरु आहे. प्लास्टिक सिलेंडर देण्यासाठी गॅस उपलब्ध आहे, मग लोखंडी सिलेंडर देण्यासाठी का नाही, असा सवालही आता ग्राहकांमधून उपस्थित केला जात आहे.

## पाईपलाईनद्वारे सुरळीत गॅस पुरवठा, सिलेंडरसाठीच अडवणूक का?

भारत पेट्रोलियम कंपनीकडून सर्वत्र गॅस पाईपलाईन टाकण्यात आली आहे. अनेक ठिकाणी या पाईपलाईनमधून गॅसपुरवठा सुरु करण्यात आला आहे. पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा सुरळीत सुरु असताना सिलेंडरसाठीच अडवणूक का करण्यात येते, असा सवालही आता ग्राहकांमधून उपस्थित केला जात आहे.

## चंद्रकांत बाफना यांचे अल्प आजाराने निधन



नगर - शिरुर रामआई येथील रहिवासी श्रीमान चंद्रकांत शोभाचंद बाफना (वय ८२) यांचे ९ मार्च रोजी घोडनदी येथे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शिरुर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## शंकर यन्नम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गुलमोहोर रोड येथील रहिवासी शंकर लक्ष्मण यन्नम (वय ८९) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, ३ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. राजेंद्र, नंदकुमार, अंबादास यन्नम यांचे ते वडील तर नरसुबाई यन्नम यांचे पती होत.

## ललीताबाई बाले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रीमती ललीताबाई गंगाराम बाले (वय ७८) यांचे ८ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संजय, अनिल, रविंद्र बाले यांच्या त्या मातोश्री होत.

## कुसुमबाई गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - समता कॉलनी, विनायकनगर येथील रहिवासी सौ. कुसुमबाई मनसुखलाल गांधी (वय ७८) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, नातवंडे, नातसुना, पंतु, पणती असा परिवार आहे. अजित गांधी यांच्या त्या मातोश्री होत.

## आकाश गायकवाड यांचे हृदयविकाराने निधन



नगर - पंचशीलनगर भिंगार येथील रहिवासी आकाश एकनाथ गायकवाड (वय ३५) यांचे ९ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, पत्नी असा परिवार आहे. अक्षय एकनाथ गायकवाड यांचे ते मोठे बंधू होत.

## बापूसाहेब पाटील मोरे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - बापूसाहेब पाटील मोरे (वय ६४) यांचे हृदयविकाराने ७ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोरेवाडी (वांबोरी) अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, ३ बहिणी, पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. राहुरी येथील वनविभागातील फिल्ड ऑफीसर गोरक्षनाथ मोरे यांचे ते मोठे बंधू, शेती उद्योजक रामेश्वर व आदिनाथ मोरे यांचे वडील, श्रीरामपूर येथील विलास घुले यांचे मामे बंधू होत. ते काही काळ कॅनरा बँकेत नोकरीस होते.

## छायाबाई व्यवहारे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीगोंदा - श्रीगोंदा येथील रहिवासी सौ.छायाबाई अशोकराव व्यवहारे (वय ६६) यांचे ९ मार्चला हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिद्धेश्वर मंदिर अमरधाम येथे अंत्यंसस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वैभव व्यवहार यांच्या त्या मातोश्री होत.



हनुमान चालिसा पाठ
मंगळवार दि. १०/३/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
निलेश शिवनाथ दारुणकर परिवार, पावर हाऊस समोर, तेलीखुंट, ९२७३०८१२३५
मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.
श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान, दत्त कॉलनी, वारुळाचा मारुती रोड, दातरंगे मळा, दिपक गुंडू ९९२२१४०१२०
श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार
राज ज्योतीनगर कॉलनी मित्र परिवार, बुरुडगाव रोड, तिर्थंकर कॉलनीच्या पुढे ९८२३०२४७७३
श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ
गणेश गोवर्धन बिटला परिवार, म्हसोबा मंदिर, सांगळे गल्ली, समर्थ शाळेजवळ
श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर
श्री आझाद तरुण मंडळ, सदर बाजार, भिंगार, ८८३०८६६२०२

# मुळा धरणात पोहताना नगरच्या तरुणाचा बुडून मृत्यू

### स्थानिक नागरिकांच्या मदतीने एकाला वाचविण्यात यश

नगर - राहुरी तालुक्यातील मुळा धरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांमधील एकाचा धरणाच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ८ मार्च रोजी दुपारच्या सुमारास घडली. तर दुसर्या तरुणाला स्थानिकांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.मयुर लाला कांबळे (वय २४, रा. बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) असे मयताचे नाव आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, अहिल्यानगर येथील बालिकाश्रम रोड परिसरातील रहिवासी मयुर लाला कांबळे, नैतिक सोनटक्के, रोहित कांबळे, विनय खिस्ती आणि आकाश प्रभूने हे पाच मित्र ८ मार्च रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास राहुरी येथील मुळा धरण परिसरात फिरण्यासाठी गेले होते. यावेळी मयुर कांबळे आणि नैतिक सोनटक्के या दोघांना धरणाच्या पाण्यात पोहण्याचा मोह झाला. ते दोघे चमेली गेस्ट हाऊसच्या पाठीमागील बाजूस पीर बाबा दर्गा जवळ धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी उतरले. मात्र दोघांनाही व्यवस्थित पोहता येत नसल्यामुळे ते खोल पाण्यात जाऊन बुडू लागले. घाबरून त्यांनी आरडाओरडा केला.

हा प्रकार लक्षात येताच परिसरातील अशोक गायकवाड, किशोर बर्डे, आमीन शेख, उमेश गंगे, रमेश निकम, संतोष गायकवाड, चांदभाई शेख, अंकुश बर्डे आदी युवकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या युवकांनी जीवाची पर्वा न करता पाण्यात उड्या मारून दोघांना वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी नैतिक सोनटक्के याला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. मात्र मयुर लाला कांबळे हा तरुण पाण्यात बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मयुर कांबळे याचे नातेवाईक राहुरी येथे दाखल झाले. मयुरचा मृतदेह पाहताच कुटुंबीयांनी मोठा हंबरडा फोडला. मयुरच्या पश्चात आई-वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे.

# नगर जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध; अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील एलपीजी गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया.

नगर - जिल्ह्यात एलपीजी गॅसच्या पुरवठ्यामध्ये नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील एलपीजी गॅस गोदामांची विशेष पथकामार्फत अचानक तपासणी करावी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. तसेच, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील एलपीजी गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी, बीपीसीएल कंपनीचे राजकुमार मिश्रा यांच्यासह संबंधित गॅस कंपन्यांचे प्रतिनिधी व गॅस वितरक उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. नियमानुसार गॅस वितरण होत असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच, गॅसची ऑनलाईन नोंदणी करून अधिकृत पुरवठाधारकांकडूनच गॅस उपलब्ध करून घ्यावा. गॅस वितरणासंदर्भात नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन १८००२२४३४४, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड १८००-२३३३-५५५, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड १८००-२३३३-५५५ या टोल फ्री क्रमांकावर अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या १०७७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी केले.

गॅस एजन्सींनी गॅस सिलिंडरचा पुरवठा वेळेत व नियमानुसार करावा. वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, तसेच ग्राहकांना वेळेत सेवा मिळेल यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करावे. प्रशासनाने गॅस पुरवठा परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

## प्रभाबाई कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - यशवंत कॉलनी छत्रपती संभाजी नगर रोड येथील रहिवासी प्रभाबाई अशोकलाल कोठारी (वय ७५) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुली, १ मुलगा, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अर्बन बँकेचे मा. चेअरमन अशोक कोठारी यांच्या त्या पत्नी तर बालरोग तज्ञ सुमतीलाल कोठारी यांच्या वहिनी तसेच दिनेश, संचेती हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अजय यांच्या त्या चुलती होत. स्वातंत्र्य सैनिक स्व. बन्सीलाल कोठारी यांच्या त्या सुनबाई होत.

## चंद्रभान गाडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सहकारनगर, सावेडी येथील रहिवासी चंद्रभान नारायण गाडेकर (वय ९५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. ते अत्यंत धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू, नात सुन, पणतु असा परीवार आहे. ॲड. सुभाष गाडेकर याचे ते वडील होत.

## पत्रकार सुधीर पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कायनेटीक चौकातील रविश हौसिंग सोसायटीतील रहिवासी पत्रकार सुधीर पवार (वय ६२) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांनी विविध दैनिकांमध्ये बातमीदार, उपसंपादक पदांवर काम केले होते. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, भाऊ असा परिवार आहे.

## १०३ व्या वर्षी जगन्नाथ वाघ यांचे निधन



नगर - बुरुडगाव येथील जगन्नाथ नामदेव वाघ यांचे वयाच्या १०३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. बुरुडगाव स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, तीन मुले, जावई, सुना, नातवंडे, पणतवंडे आणि नातूवंडे असा परिवार आहे.

जगन्नाथ वाघ हे प्रगतशील व कष्टाळू शेतकरी म्हणून परिसरात परिचित होते. आयुष्यभर शेती करत त्यांनी आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा सांभाळ केला. त्यांच्या साध्या, शांत आणि मनमिळावू स्वभावामुळे गावातील नागरिकांमध्ये त्यांना विशेष मान-सन्मान होता.

गावामध्ये ते नेहमी फेटा बांधून वावरत असत. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये त्यांची 'फेटेवाले बाबा' अशी ओळख निर्माण झाली होती. पारंपरिक वेशभूषा आणि धार्मिक वृत्तीमुळे ते गावातील ज्येष्ठ आणि आदरणीय व्यक्ती म्हणून ओळखले जात होते.

# महानगरपालिकेत महापौरांनी अचानक तपासली हजेरी; ४१ कर्मचारी 'लेटलतिफ'

### कारणे सांगताना कर्मचाऱ्यांची उडाली भंबेरी



मनपाच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभे राहून उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची हजेरी घेताना महापौर ज्योतीताई गाडे. (छाया - लहू दळवी)

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांनी सोमवारी सकाळी अचानक महापालिकेत दाखल होत कर्मचाऱ्यांची हजेरी तपासली. यात ४१ कर्मचारी लेटलतिफ आढळून आले. सकाळी ९.३० वाजता महापौर गाडे यांनी महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभे राहून उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. यावेळी कारणे सांगताना अनेक कर्मचाऱ्यांची भंबेरी उडाली. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना महापौरांनी चांगलेच सुनावले. पुढील काळात उशिरा येणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला.


महापौर ज्योतीताई गाडे यांनी ६ फेब्रुवारी रोजी पदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासनाची बैठक घेऊन सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेवर कामावर हजर रहावे, गळ्यात ओळखपत्र असावे तसेच नागरिकांची कामे प्रामाणिकपणे पार पाडावीत, अशा सूचना दिल्या होत्या. मात्र अनेक कर्मचारी या सूचनांचे पालन करत नसल्याचे दिसून येत असल्याने महापौरांनी स्वतःच कर्मचाऱ्यांची तपासणी मोहीम हाती घेतली. सकाळी साडेनऊ वाजता महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभे राहून महापौर गाडे यांनी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नोंद घेतली. यावेळी सुमारे ४१ कर्मचारी उशिरा आलेले आढळले. नागरिकांची कामे वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना वारंवार महापालिकेत हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे नागरिकांचा रोष पदाधिकाऱ्यांवर व्यक्त होतो. यापुढे कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा महापौरांनी दिला.

जे कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतील, त्यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहू; मात्र कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांना सोडले जाणार नाही. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल आणि कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशाराही महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिला.

## कडक शिस्तीचे दर्शन

सकाळी साडेनऊ वाजल्यापासून महापौर ज्योतीताई गाडे या महापालिकेच्या गेटवर उभ्या राहून कर्मचाऱ्यांची उपस्थिती तपासत होत्या. त्यांनी साडेअकरा वाजेपर्यंत गेटवर थांबून कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली. त्यांची कडक शिस्त पाहून स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्यशैलीची झलक दिसून आली. नागरिकांच्या हितासाठी पदाचा उपयोग झाला पाहिजे. जोपर्यंत मी या पदावर आहे, तोपर्यंत नागरिकांना न्याय देण्याचे काम करीन, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## बाळासाहेब पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी बाळासाहेब शिवाजी पवार (वय ५१) यांचे ७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोतीबाग अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, १ मुलगी, भाऊ, जावई असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



महापालिकेच्या स्थायी समिती व महिला बालकल्याण समितीच्या सभापतीपदासाठी अर्ज दाखल केल्यानंतर सुभाष लोंढे, दीपाली बारस्कर व वर्षा सानप यांच्या समवेत भाजप, राष्ट्रवादीचे नगरसेवक. (छाया - लहू दळवी)

# प्रशासकीय आदेशाचा भंग केल्या प्रकरणी नगरसेवक श्रीपाद छिंदमवर गुन्हा दाखल

नगर - छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शहरातून बाहेर जाण्याचे आदेश असतानाही आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी श्रीपाद शंकर छिंदम याच्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक यांनी ६ मार्च रोजी दुपारी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत श्रीपाद छिंदम याला अहिल्यानगर शहराच्या हद्दीतून निघून जाण्याचे आदेश दिले होते. या आदेशाची प्रत त्याच्या घराच्या दर्शनी भागात चिकटवून अंमलबजावणी करण्यात आली होती.

मात्र, रात्री साडेआठच्या सुमारास दिल्लीगेट परिसरात श्रीपाद छिंदम दिसून आला. पोलीस हवालदार बाबासाहेब मंजाबापू इखे आणि त्यांचे पथक तिथे बंदोबस्तावर तैनात होते. प्रशासकीय आदेशाचा भंग केल्याप्रकरणी पोलीस हवालदार बाबासाहेब इखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये छिंदम याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोफखाना पोलीस पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### आहारात करा हे बदल

फेब्रुवारी महिना सुरू असतानाच उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. वातावरणात अचानक झालेला हा बदल आपल्या शरीरासाठी त्रासदायक ठरू शकतो. उन्हाळ्याच्या या झळांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी आणि शरीर थंड ठेवण्यासाठी आहारात काही महत्त्वाचे बदल करणे गरजेचे आहे. उन्हाळ्यात घामावाटे शरीरातील पाणी कमी होते. त्यामुळे फक्त तहान लागल्यावरच पाणी न पिता, दिवसभर थोड्या थोड्या अंतराने पाणी पीत राहा. साध्या पाण्यासोबतच लिंबू पाणी, शहाळे पाणी किंवा ताकाचे सेवन करणे अधिक फायदेशीर ठरते. दही हे नैसर्गिकरीत्या थंड असते. दुपारी जेवताना वाटीभर दही किंवा जिरे टाकून केलेले ताक प्यायल्याने पोटाला थंडावा मिळतो आणि उष्णतेमुळे होणारा त्रास (उदा. पित्त) कमी होतो. उन्हाच्या कडाक्यात शरीरातील उष्णता वाढवणारे पदार्थ मर्यादित ठेवा: जास्त प्रमाणात चहा किंवा कॉफी पिणे टाळा, कारण यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. अति गोड आणि कोल्ड ड्रिंक्सऐवजी नैसर्गिक पेयांना पसंती द्या.

## पाककला

### तूर डाळ पकोडा

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलचा तुकडा खिसून, चिूटभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

**कृती :** प्रथम तूरडाळ निवडून धुवून घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल स्रु रिच घालून त्याची पेस्ट बनवून घवी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल स्रुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भजाचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपरनॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गमर तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाण्यास द्या.

## वास्तू

### खिडकी-दरवाजा संबंधी

✻ घराचे दरवाजे आणि खिडक्या आतील बाजूस उघडणाऱ्या असणे चांगले. खिडकी-दरवाजा बाहेरील बाजूस उघडणारा असल्यास हा वास्तुदोष मानला जातो.

✻ घर किंवा दुकानाचे मेनगेट पूर्व किंवा उत्तर दिशेला असणे शुभ मानले जाते परंतु असे नसल्यास घराच्या मेनगेटवर स्वस्तिक किंवा श्रीगणेशचे चिन्ह काढावे. शक्य असल्यास दररोज किंवा आठवड्यातून एकदा घराच्या दरवाजावर आंब्याचे तोरण बांधावे.

## सौंदर्य

व्यावसायिक स्वरूपासाठी, मेकअप हलका आणि नैसर्गिक असावा. लाइट लिपस्टिक, थोडी काजल आणि न्यूट्रल आयशॅडो प्रोफेशनल लुकसाठी योग्य आहेत.

## सल्ला

काळा, पांढरा, राखाडी, नेव्ही ब्लू, बेज यांसारख्या रंगांचे कपडे इतर कोणत्याही रंगांसोबत सहज मॅच होतात. असे कपडे निवडा जे कधीही 'आउट ऑफ फॅशन' होत नाहीत. उदा. प्लेन शर्ट, डेनिम जीन्स, ए-लाईन ड्रेस.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १० मार्च २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, अनुराधा १९।०५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** लोकांमध्ये मतभेद आणि अनोळखी लोकांचा विरोध आपणास अस्वस्थ करू शकते.

**वृषभ :** वेळेकडे लक्ष ठेवा. कार्यात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. कार्यक्षेत्रात मानसिक ताण होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. तसे आपले सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील.

**कर्क :** कौटुंबिक वातावरण आनंद आणेल. आर्थिक विषयांमध्ये आपल्या प्रयत्नांमुळे आपणास यश मिळेल. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

**सिंह :** करियरबद्दल आपण हट्ट धरू शकता. कठोर परिश्रम केल्यानंतर यश मिळेल. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा.

**कन्या :** महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही. उत्साहवर्धक बातमी मिळाल्याने आनंद होईल.

**तूळ :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल.

**वृश्चिक :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या आणि जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्या.

**धनु :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.


**मकर :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**कुंभ :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**मीन :** यथायोग्य विचार करून कार्य करा. मानसन्मानात वाढ होईल. महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल.

## शब्दगंध क्र. ७३८३

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हॉस्पिटल; दवाखाना ४) उलगडा; खुलासा ६) एक महसूल अधिकारी ८) शिजलेल्या डाळीचे एक पातळ कालवण; आमटी १०) ताप येण्यापूर्वीची स्थिती १२) फिकीर; पर्वा १३) अश्व; घोडा; टार १४) वीस दस्ते कागद १५) एक रोग; कॉलरा; महामारी १७) विश्वास; भरवसा १८) खूण; चिन्ह १९) विशिष्ट कंपू २०) फळातील रसाळ भाग; गर २१) मामाची पत्नी २२) शंभराचा समूह; सेंच्युरी २३) अंगावरून वारे जाणे; पक्षघात; अर्धांगवायू

**उभे शब्द :-** १) लग्नात वधुपक्षाकडून वरपक्षाला दिल्या जातित त्या विविध भेटवस्तू २) तांड्यावर वस्ती करून राहणारा एक समाज ३) मृत्यूची देवता ४) दुःखी; खिन्न ५) कोरा; न लिहिलेला (कागद) ७) पिलू; वासरू; पाडस; लहान मूल ९) लक्ष्मीचा नवरा; विष्णू ११) युद्धक्षेत्र; रणांगण १३) स्त्रियांचे एक बाहुभूषण १६) रायगडावरील एक बुरूज १७) पलंग; बाज १८) उजेड १९) काव्याचा एक प्रकार (विशेषतः उर्दू) २१) पिकांवर पडणारा एक रोग; खवा

### शब्दगंध क्र. ७३८२ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** हिरा पारखून बघायचा असेल तर काळोख होण्याची वाट बघा कारण उन्हात तर काचेचे तुकडे देखील चमकतात.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## 'लाफ्टर योगा थेरपी' म्हणजे काय?

आजच्या काळात तणाव ही एक सामान्य समस्या बनली आहे. कामाचे दडपण, नातेसंबंधातील गुंतागुंत आणि जीवनातील अनिश्चितता आपल्याला सतत चिंतेत ठेवतात. पण तुम्हाला माहित आहे का की हसणे हे एक शक्तिशाली औषध आहे जे तणाव कमी करण्यास मदत करू शकते? लाफ्टर योग थेरपी, ज्याला लाफ्टर योग असेही म्हणतात, या तत्त्वावर आधारित आहे.

लाफ्टर योगा थेरपी म्हणजे काय?

लाफ्टर योगा थेरपीमध्ये हास्याचा उपयोग व्यायाम म्हणून केला जातो. यामध्ये कोणतेही विशेष नियम किंवा धार्मिक मान्यता नाहीत. फक्त काही सोप्या व्यायामाद्वारे हसण्यास प्रेरित केले जाते. हे व्यायाम हसण्याचा आवाज, शारीरिक हालचाली आणि श्वासोच्छवासाच्या व्यायामांवर आधारित आहेत.

लाफ्टर योगा थेरपीचे फायदे :

लाफ्टर योगा थेरपीचे अनेक फायदे आहेत. हसण्यामुळे शरीरात एंडोर्फिन तयार होतात, जे नैसर्गिक वेदना कमी करणारे आणि मूड बूस्टर म्हणून काम करतात. हे तणाव संप्रेरक कोर्टिसोलची पातळी कमी करते, ज्यामुळे तणाव कमी होतो. लाफ्टर योगामुळे शरीरातील रक्तप्रवाह देखील सुधारतो, ज्यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते.

लाफ्टर योगा थेरपी करण्याचा योग्य मार्ग:

लाफ्टर योगा थेरपी कोणत्याही वयोगटातील लोकांसाठी फायदेशीर ठरू शकते. ही एक सोपी आणि प्रभावी पद्धत आहे जी तणाव कमी करण्यास, मनःस्थिती सुधारण्यास आणि संपूर्ण आरोग्यास प्रोत्साहन देते.

येथे काही साधे हास्य योग व्यायाम आहेत जे तुम्ही घरी करू शकता: हसण्याचे आवाज: हा हा हा, हो हो हो, ही हि हि असे आवाज काढा.

शारीरिक क्रियाकलाप: हसणे, हात वर करणे, उडी मारणे किंवा नृत्य करणे.

श्वासोच्छवासाचे व्यायाम: हसताना दीर्घ श्वास घ्या आणि श्वास सोडा.

नियमितपणे लाफ्टर योगा थेरपी करून तुम्ही तणावमुक्त आणि आनंदी जीवन जगू शकता.

## गठ्ठ्याचे प्रेम

एका वृद्ध महिलेचे एक छोटेसे दुकान होते जिथे ती फुले, हार आणि इतर वस्तू विकायची. ती तिच्या तुटपुंज्या कमाईतून उदरनिर्वाह करत असे.

एके दिवशी, चार प्रवासी मंदिरात दर्शनासाठी आले. त्यांनी वृद्ध महिलेकडून काही फुले विकत घेतली. फुले खरेदी करताना, त्यांनी त्यांचे सामान एका गठ्ठ्यात बांधून ठेवले आणि तिला सांगितले की ते ठेवा आणि जेव्हा ते चौघेही एकत्र आले तेव्हा ते त्यांना परत करा. काही वेळाने, एक प्रवासी परत आला आणि खुशामत करून वृद्ध महिलेला फूस लावून गठ्ठा घेतला.

जेव्हा इतर तीन प्रवासी वृद्ध महिलेकडून गठ्ठा घेण्यासाठी आले तेव्हा तिने त्यांना सांगितले की त्यांचा चौथा मित्र तो आधीच घेऊन गेला आहे.

तिन्ही प्रवाशांनी वृद्ध महिलेला कठोरपणे फटकारले आणि तिला राजदरबारात घेऊन गेले. न्यायाची याचना करत त्यांनी राजा कृष्णदेवरायांना संपूर्ण कहाणी सांगितली. राजाने त्यांची विनंती काळजीपूर्वक ऐकली आणि तेनालीरामाला प्रकरण सोडवण्याचा इशारा केला.


महाराज! या म्हातारी बाईने आमच्या वस्तूंची भरपाई करून दिली पाहिजे! तिघेही मित्र एकसुरात ओरडले.

भरपाई का? ती तुम्हाला गठ्ठा परत करेल. तेनालीरामाने त्यांना शांत होण्याचा इशारा केला आणि म्हणाला, तुम्ही गठ्ठा देण्यापूर्वी जी स्थिती ठेवली होती तीच स्थिती आहे.

ती तुम्हा तिघांना गठ्ठा देणार नाही. तुमच्या चौघांनाही ते देण्याचा करार झाला होता, म्हणून तुमच्या चौथ्या मित्राला आणा आणि तुमचे गठ्ठा घेऊन जा.

तेनालीरामाचे शब्द ऐकून तिघेही प्रवासी निराश झाले. तेनालीरामने त्यांना त्यांच्याच शब्दांनी अडकवले होते. आता ते काहीही बोलू शकले नाहीत. डोके खाली ठेवून, तिघेही प्रवासी निघून गेले. अश्याप्रकारे राजाने तेनालीरामाच्या हुशारीचे कौतुक केले.

# जीवन का अमृत (भाग १)



५३. हर मर्ज की केवल एक ही दवा है: सत्गुरु की रूहानी सहायता और दया से पवित्र शब्द धुन का अभ्यास । सत्गुरु केवल एक इंसान नहीं है। वह एक शक्ति है, जो हर हाल में हर मंडल में, हमारी आंतरिक रूहानी यात्रा के दौरान हमारा मार्गदर्शन और सहायता करती है,। जब तक

हम भौतिक शरीर में होते हैं, तो वह अपने भौतिक स्वरूप में हमें निर्देश देता है। जब हम अंतर में सूक्षम मंडल में जाते हैं, तो वह अपने सूक्षम स्वरूप में होता है। जैसे-जैसे हम और आगे बढ़ते हैं, वह हर मंडल का स्वरूप धारण करता जाता है, सचखंड पहुँचने तक।

५४. आप ठीक है, जब आप कहते हैं कि

### देहाभास

बिना सत्गुरु की ताकत के आप अंतर में पहाड़ों के ऊपर से नहीं जा सकते । देहाभास से ऊपर आना तो बहुत दूर, भक्त अपने आप कुछ नहीं कर सकता है। जब सत्गुरु एक शिष्य को नामदान देता है, तो अपनी खुद की ताकत को शिष्य में प्रकट करता है और इस प्रकार हमेशा उसके साथ रहता है और उसको परलोक में चढ़ाई करने लायक बनाता है। भक्त का फर्ज तो सिर्फ शांति से भजन-अभ्यास पर बैठना है, सारी सांसारिक मोह-माया और शारीरिक-चेतनता से अलग होकर । सत्गुरु बेचैनी से दरवाजे पर उसका इन्तजार करता है, हाथों में दया भर कर, ताकि जिस क्षण भी भक्त उसकी ओर मुड़े, उस पर दया वारसा सके। मैं इस बात में आपकी निष्ठा की कद्र करता हूँ और आपको आश्वस्त करता हूँ कि निरुत्साहित होने की कोई बात नहीं है। आपको सिर्फ उसकी ओर मुड़ना है।

५५. सत्गुरु प्रभु के नाम में दिव्य भाईचारा बनाते हैं। वे मानवता के रत्न हैं, जो अपना विकास पूरा करके प्रभु जितने ऊँचे उठ चुके हैं। वे प्रभु से पूरी तरह एकमेक हो चुके होते हैं और प्रभु के पवित्र शब्द से लबालब भरे होते हैं ।

आध्यात्मिक जीवन का प्रकट होना, सत्गुरु की दया से, तीव्र हो जाता है। यह दया बहुत मायने रखती है। यह आत्मा की आंतरिक संभावनाओं में जान डाल देती है। यह हमारी आध्यात्मिक जिंदगी को जागृत करती है और हमें परम लक्ष्य की ओर ले जाती है। यह जागृत करने वाली प्रेरणा

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : या गोष्टी आपल्याकडे बाहेरून येतात आणि आपण त्यांना बाहेर पाठवतो. परिस्थिती आणि माणसं बाहेरून येतात. त्यांच्याकडून आपल्याला जे मिळतं त्यावर आपलं नियंत्रण नसतं. पण आपल्याकडून जे विचार बाहेर जातात - जसं, आपण त्यांच्याबद्दल काय विचार करतो - हे आपल्या नियंत्रणात असतं, बरोबर ना ?

सुरेश ओबेरॉय : नाही, आपण जे विचार बाहेर आणतो कदाचित तेही आपल्या नियंत्रणाबाहेर असतील. कधीकधी आपोआपच आपल्याकडून एखाद्याला मनापासून आशीर्वाद दिला जातो त्याप्रम णेच नकारात्मक भावनाही आपोआपच निर्माण होतात.

शिवानीदीदी : एखादी व्यक्ती तुमच्याशी चांगली वागली तर प्रतिसाद म्हणून तुमच्या मनात तिच्यासाठी आशीर्वादाचा भाव येतो. पण हा चांगला विचार कोणी निर्माण केला ?

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय : तो विचार माझ्या मनात आपोआपच आला.

शिवानीदीदी : बरं, आपण विचारांबद्दल नको बोलू या. तुम्ही जे काही बोलता ती

कोणाची निर्मिती आहे?

सुरेश ओबेरॉय : माझी.

विचार, शब्द आणि कर्म : माझी स्वतःचीच निर्मिती!

शिवानीदीदी : बोलताना, काय बोलायचं यासाठी आपण शब्द निवडू शकतो का? की ते आपोआप तोंडातून बाहेर पडतात?

सुरेश ओबेरॉय : परिस्थितीअनुसार प्रतिसाद देताना ते आपोआपच येतात. शिवानीदीदी : याचा अर्थ आपण अज्ञानावस्थेत जगतोय. एखादी कृती, ती का करतोय हे माहीत नसूनही करणं म्हणजे अज्ञानावस्था. जर काही आपोआप होत असेल तर त्या बाबत आपल्याकडे निवड करण्यासाठी पर्याय उपलब्धच नाहीत, असा याचा अर्थ होतो. जर आपल्याला असं वाटत असेल की आपण जे बोलतो ते शब्द आपोआप येतात आणि आपण त्यांची निवड करत नाही, तर आपल्याला काय बोलायचं आहे त्याचं स्वातंत्र्य आपल्याकडे राहणार नाही.

आपल्याला आजूबाजूला घडणाऱ्या घटनांची जाणीव आहे, पण आपल्या मनात काय घडतंय त्या बाबत आपण सजग आहोत का? इतर लोक आपल्याशी कसे वागतात ह्याची जाणीव आहे पण मग अशा वेळी आपण कसं वागलं पाहिजे याची जाणीव आपल्याला आहे का? सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आपण जे बोलतो ते शब्द ही आपली निर्मिती आहे याची जाणीव आपल्याला आहे का?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एका जाड बाईने चोर पकडला आणि त्याच्यावर बसली
आणि नोकराला पोलिसांना बोलावण्यास सांगितले,
नोकर : माझी चप्पल सापडत नाहीये...
चोर ओरडुन : अरे रताळ्या माझी चप्पल घाल पण लवकर जा....

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतातील १ टक्के श्रीमंतांकडे एकूण किती संपत्ती एकवटली आहे?
- ४०.६ टक्के

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

## करवंदे

करवंदांमध्ये मोठ्या प्रमाणात सायट्रिक ॲसिड असल्यामुळे उष्णतेमुळे होणारे विकार करवंदे सेवनाने कमी होतात. सूर्याच्या प्रखर उष्णतेने जर शरीराचा दाह होत असेल, तर करवंदांचे सरबत करून प्यावे. करवंदांमध्ये फायबर भरपूर प्रमाणात असल्याने मलावष्टंभाचा त्रास कमी होतो. अरुची, मळमळ, उलटी या विकारामध्ये करवंदे अत्यंत गुणकारी आहेत. आम्लपित्तामुळे छातीत जळजळ होत असेल, तसेच आंबट ढेकरा येत असतील तर अशा अवस्थेत करवंदांचे सरबत थोड्या थोड्या अंतराने पीत राहावे, काही वेळाने आराम वाटतो.

इंग्रजीमध्ये डोंगरची काळी मैना म्हणून प्रचलित असलेले करवंदे हे काळे लहानगे फळ आरोग्याच्या दृष्टिकोनातून फार उपयुक्त आहे. सहसा याची झाडे जंगलामध्ये, डोंगरकड्यांमध्ये असतात. करवंदे हा रानमेवा आवर्जून सर्वांनी आरोग्यरक्षणासाठी अवश्य खावा. मराठीमध्ये करवंदे, हिंदीमध्ये खट्टा-मीठा, क्रॅनबेरी, तर शास्त्रीय भाषेत ऑक्सिकोकस या नावाने ओखळले जाते. करवंदे ही वनस्पती अपोसायनेसी या कुळातील आहे.

औषधी गुणधर्म व उपयोग : १) करवंदे हा रानमेवा कोठल्याही परिरक्षकांचा वापर न करता नैसर्गिकरीत्या उपलब्ध झालेला असल्यामुळे

९) करवंदांमध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असल्याने हृदयविकारामध्ये करवंदांचे सेवन उपयुक्त ठरते. यामुळे रक्तावाहिन्यातील चरबीचे प्रमाण कमी होऊन रक्तपुरवठा सुरळीत होतो.

१०) करवंदांच्या रसामध्ये मधुरता आणि आम्लता असल्यामुळे अपचन झाले असेल, तर अन्नाचे होण्यासाठी करवंदांचे सरबत थोड्याच अंतराने पीत राहावे.

११) करवंदे वातशामक असल्यामुळे पोटात गुबारा धरला असेल, तर करवंद सेवनाने पोट व आतड्यांचे आरोग्य चांगले राहून वायूचे मलावाटे निसरन होते. १२) करवंदाची पाने हीदेखील औषधी गुणधर्माने युक्त आहेत. ही पाने मधामध्ये बारीक करून खाल्लयास कोरडा खोकला नाहीसा होतो.

१३) करवंदांमध्ये नैसर्गिकरीत्या कॅल्शिअम भरपूर प्रमाणात असल्याने हाडांच्या विकारांमध्ये करवंदे सेवनाचा लाभ होतो. वर्षभर करवंदे खाता यावे म्हणून करवंदांचे लोणचे, मुरांबा, सरबत बनवून ठेवावे. १४) गर्भवतीने उलटी, मळमळ, अरुची ही भावना कमी होण्यासाठी व विपुल प्रमाणात कॅल्शिअम मिळण्यासाठी ऋतूमध्ये मूठभर करवंदे खावीत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सोशल मीडियाचा योग्य-अयोग्य वापर विद्यार्थ्यांना शिक्षणातूनच मिळतो

**नगरसेविका अश्विनीताई लोंढे यांचे प्रतिपादन; मनपा आदर्शनगर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात**

नगर – जसजसे तंत्रज्ञान झपाट्याने वाढत चालले आहे तसतसे स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालकांना आपल्या मुलाकडून त्याच्या भविष्याला धरून अनेक अपेक्षा वाढतच आहेत. त्यातच उपलब्ध संसाधने जितकी चांगली आहेत तितकीच मुलासांठी घातक ठरताना आपल्याला दिसत आहेत. अंगणवाडीच्या चिमुकल्यापासून तर तरुणाईपर्यंत सर्वांनाच मोबाईल ने भुरळ घातली आहे. सोशल मीडियाने यामधून अनेक बालके तरुण तासंतास आपला वेळ या सोशल मीडियावर घालवत आहेत. काही बालके तर मोबाईलच्या आहारी जाताना आपण पाहत आहोत त्यांना ते आज फक्त मनोरंजन वाटत असले तरी त्यातील योग्य – अयोग्य पणा व त्याचे विपरीत परिणाम त्यांना अवगत नाहीत. याचा त्यांच्या आरोग्यावर देखील विपारित परिणाम होत आहे. हाच धागा धरत आज आदर्शनगर केडगाव शाळेतील बालचमुनी सोशल मीडिया ड्रामा या समूह नृत्यातून सोशल मीडियाचा योग्य –अयोग्य वापर हा शिक्षणातूनच मिळतो हे दाखवून नव्हे तर पटवूनच दिले आहे. बालचमुनी सादर केलेल्या या नृत्याचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे, असे प्रतिपादन मनपा नगरसेविका अश्विनीताई लोंढे यांनी केले. मनपा आदर्शनगर शाळेच्या स्नेहसंमेलनाप्रसंगी केले. अध्यक्षीय भाषणात त्या बोलत होत्या.


मनपा आदर्शनगर शाळेच्या स्नेहसंमेलनाची सुरुवात सरस्वती पूजन व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस तिथीनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. यानंतर सरस्वती पूजन करून म हापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने स्नेहसंमेलनास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, सुमित लोंढे, मनपा शाळाचे मुख्याध्यापक शशिकांत वाघुलकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वैशाली मेकल, भाऊसाहेब कबाडी, अरुण पवार, अमोल बोठे, संदीप राजळे, बडे सर, विजय घिगे, मगर सर, शशिकांत वाघुलकर, युवराज मोरे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा सोनाली चव्हाण, समिती सदस्य, अंगणवाडी सेविका लोंढे मॅडम, वैष्णवी खोडके, तसेच पालक उपस्थित होते.

नगरसेवक मनोज कोतकर यांनी बालकांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीते, सांस्कृतिक, समाज प्रबोधन पर नाटिका, भक्तीपर गीते याचे तोंड भरून कौतुक करत, शाळेतील शिक्षकांचा यासाठी सिंहाचा वाटा आहे. या शाळेमध्ये प्रत्येक वर्षी स्नेहसंमेलनात काही ना काही अनोखे सादरीकरण होताना मी पाहत आलो आहे. शाळेतील शिक्षक मेहनती व जिद्दी आहेत. वेळोवेळी त्यांनी मागितलेली मदत आम्ही करत आलो आहोत. भविष्यात देखील यात खंत पडणार नाही अशी ग्वाही देतो. असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी नगरसेवक मयूर बांगरे व निशा हॉटेलचे संचालक जालिंदर कोतकर व सुमित लोंढे यांची देखील यावेळी भाषणे झाली. प्रास्ताविकामध्ये मुख्याध्यापिका वैशाली मेकल यांनी शाळेतील गतवर्षीचा शाळेतील प्रगतीचा व भविष्यातील नियोजनाचा आराखडा मांडला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत वाघुलकर यांनी केले. शिक्षक युवराज मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनपा शिक्षक वृंद समिती सदस्य व पालक यांनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

**नाटक आणि लोकसंपादणी**




संस्कृत नाटक आणि रंगभूमी हे मानवी भावभावनांच्या अभिव्यक्तिला लाभलेले एक सांस्कृतिक परिमाण आहे. भरताने नाट्यशास्त्रात नाटकाविषयी 'नाट्यमित्यभिधीयते....' असे म्हणत जी नाटकांची व्याख्या केली आहे, 'या जगात सुख–दुःखांनी युक्त असा लोकस्वभाव दिसून येतो. तोच अंगादी अभिनयांनी युक्त असला म्हणजे त्याला नाट्य असे म्हणतात. 'प्रसिद्ध रंगकर्मी आणि नाट्यविषयाच्या अभ्यासक विजया मेहता यांनी रत्नागिरी येथे त्यांच्या शिष्य परिवाराने केलेल्या सत्कार समारंभात म्हटले होते की 'रंगमंचावरील मिथ्या जगात वावरताना घेतलेला सत्याचा शोध म्हणजे नाटक'. कल्पनेचा खोटा फुलवरा निर्माण करून सत्याचा आभास येथे उभा केला जातो आणि मानवी गुण व संवेदना यामध्ये रूपांतरित होतात. नाटक ही भाव आणि अवस्था यांची अनुभूती आहे.

या अनुभूतीत सौंदर्यव्यापारही अभिप्रेत आहे. लोकवृत्तीत दिसून येणाऱ्या भाव आणि अवस्था जेव्हा सौंदर्य व्यापारातून अभिव्यक्त होतात तेव्हा ते नाट्य होते. ही अभिव्यक्ती अभिनयाच्या साधनाने होते. हे सांगताना भरताने लोकधर्मी व नाट्यधर्मी अशा दोन धर्मी सांगितल्या आहेत. लोकधर्मी ही अनुभवांच्या अभिनयाशी निगडित आहे तर नाट्यधर्मी ही नाट्यागत सौंदर्य व्यापाराशी निगडित आहे. नाटकाच्या अभिव्यक्तिला आणि सादरीकरणाला कारणीभूत असणारे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे नट आणि नाटककार. नाटक हा या दोघांचाही व्यापार आहे. नाटककार हा भावाचे अनुकीर्तन करण्यासाठी लौकिक प्रवृत्तीचे दर्शन नाटकाच्या कथानकातून घडवतो. नाट्यातील कथावस्तूचा जो भाग लोकवार्ता क्रियेने युक्त होतो त्यालाच लोकधर्मी म्हणायचे. नाटककाराने लिहिलेली उत्तम शब्दकृती उत्तम अभिनयाने ठसविण्याचे काम नटाला करावे लागते.

नाटकात संवाद लिहावे लागतात आणि संवाद वठवावे लागतात. संवाद हे नाट्याचे शरीर आहे. ते शब्दसंवादातून जन्म घेते आणि अभिनय संवादातून उभे राहते. आंगिक, आहार्य आणि सात्त्विक असे तीन प्रकारचे अभिनय असतात. या भूमिकेतून शंभू मित्रा यांचे वाक्य महत्त्वपूर्ण वाटते. ते म्हणतात, 'नट हा वाद्यही असतो आणि वादकही असतो. तो स्वतः चे वास्तव जीवन विसरून रंगभूमीच्या विश्वाशी एकरूपी झालेला असतो. '

बहुरूपी विविध सोंगे घेतो. त्यात स्त्री–पुरुषांचीही रूपे असतात. ज्ञानदेव म्हणतात, पण तो बहुरूपी स्त्री–पुरुष भाव विसरून 'लोकसंपादणी तैसीच करतो' लोकसंपादणी करीत उभा असतो. ही लोकसंपादणीच रंगभूमीवरील नटरंग खुलवीत जाते आणि मानवी भावभावनाचे दर्शन घडविते. **– किशोर गांधी**


सावेडी येथील सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

नगर – सावेडी येथील सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवरायांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा बोर्डे, केशवराव हायस्कूलचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड, उपक्रमशील शिक्षिका साधना कुकडे, मनीषा चौरे, कांचन मिरपगार, किरणताई बारस्कर, जयश्री लांडे, मनीषा हिवाळे आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मीराज स्कूलमध्ये महिला दिनानिमित्त उद्योजिका महिलांचे एक्झिबिशन

नगर – भिस्तबाग येथील मीराज स्कूलमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त उद्योजिका महिलांसाठी एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.


भिस्तबाग येथील मीराज स्कूलमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त उद्योजिका महिलांसाठी एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास नगरसेविका दिपाली बारस्कर, यशवंती महिला मंडळाच्या संस्थापिका मायाताई कोल्हे, तसेच राजश्री ताकटे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन मीराज स्कूलच्या मुख्याध्यापिका मीरा बारस्कर तसेच योगशिक्षिका मनीषा उल्हारे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उपस्थित महिलांनी उत्साहपूर्ण वातावरणात रंगांची उधळण करत रंगपंचमीही साजरी केली.

मुख्याध्यापिका मीरा बारस्कर म्हणाल्या की, महिला ही केवळ घर सांभाळणारी नसून कुटुंबाची ताकद, संस्कारांची शिल्पकार आणि समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. एका महिलेच्या कार्यामुळे संपूर्ण कुटुंब घडते आणि कुटुंबातूनच समाज व राष्ट्र मजबूत बनते. महिलांच्या कला, उद्योग व कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा उपक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला महिला, पालक व नागरिकांचा प्रतिसाद लाभला. महिला दिनानिमित्त सर्वांनी स्वतःवर विश्वास ठेवून एकमेकींना साथ देत समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटलच्या सहकार्याने नगरमध्ये 'इंदिरा आयव्हीएफ'चे नवीन वंध्यत्व उपचार केंद्र सुरू

नगर – भारतातील अग्रगण्य आयव्हीएफ साखळी असलेल्या इंदिरा आयव्हीएफ तर्फे मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटलच्या सहकार्याने अहिल्यानगर येथे नवीन वंध्यत्व उपचार केंद्र सुरू करण्यात आले. ८ मार्च रोजी या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्राच्या माध्यमातून परिसरातील रुग्णांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आणि संघटित वंध्यत्व उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत.


मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटलच्या सहकार्याने सुरू झालेल्या इंदिरा आयव्हीएफचे नवीन वंध्यत्व उपचार केंद्राचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप आदी.

हे केंद्र सावेडी येथील नगर–मनमाड महामार्गावर एआरके हाइट्स, हॉटेल सांबरजवळ असलेल्या मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटलमध्ये सुरू करण्यात आले आहे. येथे वंध्यत्व आणि सहाय्यक प्रजननाशी संबंधित सर्वसमावेशक सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या सेवा इंदिरा आयव्हीएफच्या प्रमाणित क्लिनिकल प्रोटोकॉल आणि प्रगत प्रयोगशाळा प्रणालींच्या आधारे दिल्या जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

उद्घाटन सोहळ्यास आमदार संग्राम जगताप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पंकज मते, तसेच दोन्ही संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय तज्ज्ञ उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, जिल्हा स्तरावर आरोग्यसेवेची पायाभूत सुविधा मजबूत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या नव्या केंद्रामुळे अहिल्यानगर आणि आसपासच्या परिसरातील कुटुंबांना त्यांच्या स्वतःच्या शहरातच वंध्यत्वासंबंधी सल्लामसलत आणि उपचार घेणे अधिक सोयीचे होणार आहे.

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नितिज मुर्डिया यांनी सांगितले की, मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटलसोबतचे हे सहकार्य अधिकाधिक प्रदेशांमध्ये संघटित वंध्यत्व उपचार सेवा पोहोचवण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. अहिल्यानगर केंद्रामध्ये रुग्णसेवेत सातत्य राखण्यासाठी एकसमान क्लिनिकल प्रोटोकॉल आणि स्थापित प्रयोगशाळा प्रक्रिया वापरण्यात येतील.

हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पंकज मते म्हणाले की, वंध्यत्व उपचारासाठी अचूक तपासणी, योग्य समुपदेशन आणि नियोजित उपचार प्रक्रिया आवश्यक असते. या सहकार्यामुळे अहिल्यानगरमधील रुग्णांना परिचित आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा वातावरणात आधुनिक वंध्यत्व उपचार सेवा मिळणार आहेत.

दरम्यान, या नवीन केंद्राच्या सुरूवातीसह इंदिरा आयव्हीएफचे देशभरातील क्लिनिकचे जाळे आता २०० हून अधिक केंद्रांपर्यंत विस्तारले आहे. अहिल्यानगर केंद्रामध्ये पुरुष आणि स्त्रिया दोघांमधील वंध्यत्वासाठी विविध प्रकारच्या वंध्यत्व व सहाय्यक प्रजनन सेवा उपलब्ध असतील. या सेवांना प्रमाणित प्रयोगशाळा पद्धती, इलेक्ट्रॉनिक मेडिकल रेकॉर्ड्स आणि रुग्ण सुरक्षितता प्रणालींचा आधार असणार आहे.


महिला दिनानिमित्त कोहिनूर मॉल येथे सैनिकांच्या कुटुंबातील महिलांसाठी विशेष कार्यक्रम पार पडला.

# वीरनारींचा व सैनिकांच्या कुटुंबातील महिलांचा कोहिनूर मॉलमध्ये महिला दिनानिमित्त सन्मान

नगर – आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी कोहिनूर मॉल येथे सैनिकांच्या कुटुंबातील महिलांसाठी विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. देशासाठी सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या मागे ठामपणे उभ्या असलेल्या महिलांचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित महिलांच्या स्वागताने झाली. सैनिकांच्या कुटुंबातील महिला, वीरपत्नी तसेच महिला या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. आपल्या सैनिकामागची ताकद असलेल्या महिलांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

वीरनारी या एकमेकींना साथ देत, धैर्य आणि आत्मविश्वासाने आयुष्य जगतात. अशा वीरनारींना समाजाने नेहमीच आदर व मान द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमात विविध मनोरंजक खेळ, कविता सादरीकरण आणि महिलांच्या अनुभवांचे मनोगत यामुळे वातावरण उत्साही झाले. प्रसाद गोरे यांच्या विनोदी सादरीकरणाने उपस्थित महिलांना खळखळून हसवले. तसेच काही महिलांनी प्रेरणादायी कविता सादर करून कार्यक्रमात भावनिक रंग भरला.

यावेळी श्वेता गांधी यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधत त्यांच्या अनुभवांविषयी चर्चा केली. कार्यक्रमात अश्विन गांधी, श्वेता गांधी, साहिल बोगावत, शामली कटारिया, श्रद्धा भोसले आणि प्रियंका चावला यांची प्रमुख उपस्थिती होती. सैनिकांच्या कुटुंबातील महिलांचा सन्मान करून त्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप्ती शुक्रे यांनी केले.

महिलांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती.

# संगीत विशारद परीक्षेत दिप्ती द्यावनपेल्ली प्रथम



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ आयोजित नोव्हेंबर – डिसेंबर २०२५ सत्रातील शास्त्रीय गायन वादन परीक्षेत श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतनची विद्यार्थिनी दिप्ती यल्लप्पा द्यावनपेल्ली हिने यश संपादन केले आहे. बी.ए. समकक्ष मानल्या जाणाऱ्या 'संगीत विशारद' परीक्षेत तिने गायन या विषयामध्ये प्रथम श्रेणीत नैपुण्य मिळवत अहिल्यानगर केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

दिप्तीने हे यश श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतनच्या संचालिका गुरुवर्या सु. संपदा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मिळवले. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाची संगीत परीक्षा ही शास्त्रीय संगीत क्षेत्रातील प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते आणि अशा परीक्षेत प्रथम श्रेणीत नैपुण्य मिळवत केंद्रात प्रथम येणे ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

# पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी जगदीश वाघ यांची तर व्हाईस चेअरमनपदी किशोर सांगळे यांची निवड

**पतसंस्थेत विकास पॅनलची सत्ता कायम : अध्यक्ष किशोर गांगर्डे यांचे उद्गार; सभासदांच्या हितासाठी पारदर्शक कारभारकरण्याचा नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा निर्धार**

नगर – पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली. जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील किरण आव्हाड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

संस्थेच्या चेअरमन पदासाठी झालेल्या मतदानात जगदीश भगवान वाघ यांना बहुमत मिळाले. एकूण झालेल्या मतदानात १६ विरुद्ध ५ मतांनी जगदीश वाघ यांची चेअरमनपदी निवड झाली. संचालक मंडळातील बहुसंख्य सदस्यांनी त्यांना पाठिंबा दिल्याने त्यांची निवड स्पष्ट बहुमताने झाली. तर व्हाईस चेअरमन पदासाठी किशोर धोंडीराम सांगळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड प्रक्रियेनंतर संस्थेच्या कामकाजाबाबत काही संचालकांनी मत व्यक्त केले.


पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी जगदीश वाघ यांची तर व्हाईस चेअरमनपदी किशोर सांगळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विकास पॅनलचे अध्यक्ष किशोर गांगर्डे यांनी मावळत्या चेअरमनवर टीका करताना सांगितले की, एकाधिकारशाही पद्धतीने मनमानी कारभार केला जात होता. त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतरही पदाचा मोह सुटत नव्हता. संस्थेतील काही कामकाजात भ्रष्टाचार उघड झाल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

यावेळी उपस्थित संचालकांनी संस्थेच्या भविष्यासंदर्भात सकारात्मक भूमिका व्यक्त केली. संचालक मंडळाच्या वतीने सभासदांच्या हिताचा विचार करून पारदर्शक व विकासाभिमुख निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही देण्यात आली.

नवनिर्वाचित चेअरमन जगदीश वाघ यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रतिक्रिया देताना सांगितले की, संस्थेच्या सभासदांचा विश्वास कायम ठेवणे हीच आपली प्राथमिकता राहील. पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीत अधिक मजबुती आणण्यासाठी तसेच सभासदांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. संस्थेची भरभराट आणि सभासदांचे हित हेच ध्येय ठेवून काम करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या निवडीमध्ये विकास पॅनलने एकजूट दाखवत चेअरमन निवड प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. संचालक मंडळातील सदस्यांच्या एकमतामुळे निवड प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचे सांगण्यात आले.

निवड प्रक्रियेनंतर उपस्थित संचालक व सभासदांनी नवनिर्वाचित चेअरमन जगदीश वाघ आणि व्हाईस चेअरमन किशोर सांगळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी सत्ताधारी संचालक मंडळाने गुळालाची उधळण करून जल्लोष केला. या वेळी संस्थेचे माजी चेअरमन भानुदास कल्हापुरे, दत्तात्रय गडाख, बाळकृष्ण काळे, सर्जेराव ठोंबरे उपस्थित होते. तसेच मराठा नागरी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन बी. एम. काळे, मते सर व पाटबंधारे संस्थेचे स्वीकृत संचालक मच्छिंद्र तावरे, संस्थेचे सभासद आणि कर्मचारी उपस्थित होते.

# अर्थजगत

**गुंतवणुकीचा आढावा सामान्यतः दरवर्षी घेतला जातो, मात्र जोखीम संरक्षणाकडे (विमा कवच) अनेकदा वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले जाते. वर्षाच्या अखेरीस आर्थिक नियोजनाचा भाग म्हणून, विमा तज्ज्ञ व्यक्तींना केवळ गुंतवणुकीच्या परताव्याकडे न पाहता आर्थिक सुरक्षेचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या मुदत विम्याचे (टर्म इन्शुरन्स) पुनर्मूल्यांकन करण्याचा आग्रह धरत आहेत. गुंतवणुकीचे मूल्य आपण वेळोवेळी तपासतो, पण विमा कवच मात्र आहे तसेच ठेवले जाते.**

## गरज मुदतविम्याचा फेरविचार करण्याची

मुदत विम्याची प्राथमिक भूमिका म्हणजे उत्पन्नाची जागा घेणे. कमावत्या व्यक्तीच्या अकाली निधनानंतर अवलंबितांना त्यांची जीवनशैली कायम राखता येईल इतके हे कवच पुरेसे असावे.

विम्याची रक्कम सध्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या किमान १० ते १५ पट असणे हा एक चांगला प्रारंभ बिंदू असू शकतो. यामुळे गमावलेल्या उत्पन्नाची भरपाई दीर्घकाळासाठी होऊ शकेल. अवलंबितांच्या राहणीमानाचा खर्च ते किती वर्षे या उत्पन्नावर अवलंबून असतील त्यानुसार मोजला पाहिजे आणि त्याचे वर्तमान मूल्य विचारात घेतले पाहिजे.

मुदत विमा हा कर्जफेडीचे साधन म्हणूनही काम करतो. यासाठी तुमचे विमा कवच सर्व सक्रिय दायित्वे आणि कर्जे पूर्णपणे फेडण्यासाठी पुरेसे असल्याची खात्री करा, जेणेकरून तुमच्या वारसांवर असा कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही ज्यामुळे त्यांच्या बचतीला धक्का लागेल. मुलांचे उच्च शिक्षण किंवा लग्न यांसारख्या भविष्यातील आर्थिक उद्दिष्टांसाठी स्पष्ट तरतूद असणे आवश्यक आहे. आज जी रक्कम पुरेशी वाटते, ती एका दशकानंतर कमी पडू शकते. यासाठी ५ ते ६ टक्के दीर्घकालीन महागाई दर गृहीत धरून नियोजन करावे.

विमा कवच कधी वाढवावे, याचे काही महत्त्वाचे टप्पे आहेत. लग्न हा त्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. मेहता यांच्या मते,



दोन्ही जोडीदार कमावते असले तरी सामायिक जबाबदाऱ्या वाढतात, त्यामुळे त्यांच्या भविष्यातील जीवनशैलीचे रक्षण करण्यासाठी उच्च विमा कवच आवश्यक ठरते. मुलाचा जन्म झाल्यावर शिक्षण आणि लग्नासह अनेक दशकांच्या वचनबद्धता सुरू होतात. यामुळे विम्यात मोठी वाढ करणे अनिवार्य होते. याशिवाय, मोठी कर्जे, विशेषतः गृहकर्ज घेतल्यास विमा वाढवणे गरजेचे आहे. उत्पन्नात झालेली मोठी वाढ हे देखील एक लक्षण आहे, कारण कुटुंबाचे राहणीमान टिकवण्यासाठी ज्या उत्पन्नाची जागा विम्याला घ्यायची आहे, ते मूल्य आता वाढलेले असते.

विमा कवच कमी करण्याचा निर्णय मात्र अत्यंत सावधगिरीने घेतला पाहिजे. जेव्हा पॉलिसीधारक पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतो आणि त्याच्यावर कोणीही अवलंबून नसते, तेव्हाच असा विचार करणे योग्य ठरते. याचा अर्थ सर्व मोठी कर्जे पूर्णपणे फेडली गेली आहेत, मुले आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाली आहेत आणि जोडीदाराची जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी पुरेसा सेवानिवृत्ती निधी आणि गुंतवणूक उपलब्ध आहे.

तरीही, वाढती महागाई क्रयशक्ती कमी करते. तसेच, वाढत्या वयानुसार आरोग्याचा खर्च झपाट्याने वाढू शकतो आणि वृद्धापकाळातील आरोग्य संकट सेवानिवृत्तीच्या बचतीला मोठा फळसा लावू शकते. विमा संरक्षणाचे कवच अकाली काढून टाकल्यास हयात जोडीदार आर्थिकदृष्ट्या असुरक्षित होऊ शकतो. शिवाय, वयाच्या उत्तरार्धात विमा कवच वाढवणे अधिक खर्चिक असते. प्रत्यक्षात अनेक मुदत विमा पॉलिसीमध्ये मुदत संपण्यापूर्वी विम्याची रक्कम कमी करण्याची परवानगी नसते. ज्यांच्याकडे अनेक पॉलिसी आहेत, ते भविष्यात काही पॉलिसी बंद करून एकूण कव्हरेज कमी करण्याचा पर्याय निवडू शकतात. विम्याच्या बाबतीत काही गुणात्मक तपासण्याही आवश्यक आहेत.

पॉलिसीचा कालावधी हा तुमच्या आर्थिक जबाबदाऱ्यांपेक्षा जास्त असावा.

लवकर सेवानिवृत्तीचे नियोजन केले असले, तरी मुले त्यांचे शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी होईपर्यंत पॉलिसी असणे गरजेचे आहे. जोपर्यंत जोडीदार किंवा वृद्ध माता-पिता तुमच्या उत्पन्नावर अवलंबून आहेत, तोपर्यंत विमा कवच सुरू असावे.

क्लेमच्या वेळी वाद आणि विलंब टाळण्यासाठी वारसदाराचा (नॉमिनी) तपशील अचूक आणि अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पॉलिसीधारकांनी विमा कंपनीचा क्लेम सेटलमेंट रेकॉर्ड देखील तपासला पाहिजे, कारण मजबूत ट्रॅक रेकॉर्ड विश्वासार्हतेचे प्रतीक असतो.

काही तांत्रिक कलमे समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बहुतांश जीवन विमा पॉलिसीमध्ये पॉलिसी सुरू झाल्यापासून किंवा पुनरुज्जीवित झाल्यापासून एक वर्षाच्या प्रतीक्षा कालावधीसह आत्महत्या कलम समाविष्ट असते. पॉलिसीधारकाचा मृत्यू प्रतीक्षा कालावधीत आत्महत्येने झाला, तर लाभार्थी एकूण भरलेल्या प्रीमियमच्या ८० टक्के रक्कम किंवा युलिपच्या बाबतीत फंड मूल्य मिळविण्यास पात्र असतो.

वारसदाराचे नाव 'केवायसी' कागदपत्रांशी तंतोतंत जुळत असल्याची खात्री करा. स्पेलिंगमधील छोटी चूक, नावातील आद्याक्षरे किंवा जन्म तारखेतील तफावत देखील क्लेम सेटलमेंटला विलंब करू शकते.



## आयटी समभागांतील घसरणीनंतरही 'टेक फंडां'चा दबदबा कसा?

**गेल्या एका वर्षात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील समभागांमध्ये मोठी घसरण होऊनही, बहुतांश टेक म्युच्युअल फंड योजनांनी गुंतवणूकदारांचा तोटा कमी करण्यात यश मिळवले आहे. ॲक्टिव्ह टेक फंडांमध्ये वर्षभरात सरासरी ५.८ टक्के घसरण झाली आहे, तर दुसरीकडे 'निफ्टी आयटी इंडेक्स' तब्बल १७ टक्क्यांनी गडगडला आहे. तज्ज्ञांच्या मते, या सक्रिय योजनांना त्यांच्या वैविध्यपूर्ण स्वरूपामुळे फायदा झाला आहे. डिजिटल आणि आयटी कंपन्यांव्यतिरिक्त, नव्या युगातील कंपन्या (न्यू जनरेशन कंपन्या) या योजनांचा मुख्य आधार आहेत.**

**निर्देशांक आणि फंडांच्या कामगिरीतील तफावत**

टेक फंड आणि आयटी सूचकांकांच्या कामगिरीतील या मोठ्या फरकाचे कारण 'निफ्टी इंडिया डिजिटल निर्देशांका'च्या रचनेवरून स्पष्ट होते. हा इंडेक्स भारतातील तंत्रज्ञान क्षेत्राचे व्यापक प्रतिनिधित्व करतो. यातील १० मोठ्या कंपन्यांपैकी सहा कंपन्याह्न इटरनल, भारती एअरटेल, पीबी फिनटेक, इन्फो एज (इंडिया), वन९७ कम्युनिकेशन्स आणि स्विगीह्न या गैर-आयटी क्षेत्रातील आहेत. गेल्या एका वर्षात सुमारे ३.५ टक्क्यांची घसरण नोंदवणाऱ्या या निर्देशांकाची कामगिरी सक्रिय टेक फंडांच्या कामगिरीशी सुसंगत राहिली आहे.

**वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओचा लाभ**

फंड मॅनेजर्सनी टेक फंडांच्या मजबुतीचे श्रेय त्यांच्या वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओला दिले आहे. इन्व्हेस्को फंडाचे व्यवस्थापक हितेन जैन सांगतात की, आमची योजना आयटी सेवांसह अशा व्यवसायांमध्ये गुंतवणूक करते जिथे तंत्रज्ञान हा मुख्य विषय आहे. यामध्ये ग्राहक तंत्रज्ञान (कंझ्युमर टेक), फिनटेक, औद्योगिक तंत्रज्ञान, हार्डवेअर आणि दूरसंचार क्षेत्राचा समावेश होतो. ज्या कंपन्यांनी तंत्रज्ञानात सुरुवातीलाच मोठी गुंतवणूक केली आहे आणि जिथे विकासाची मोठी संधी आहे, अशा कंपन्यांमध्ये हा फंड गुंतवणूक करतो. हा प्रामुख्याने विकासोन्मुख (ग्रोथ ओरिएंटेड) फंड असून, त्याच्या संरचनेत 'व्हॅल्यू'चा वाटा सुमारे २५ टक्के आहे.

**जागतिक गुंतवणुकीचा आधार**

एडेलवाइस टेक्नॉलॉजीसारख्या काही फंडांना त्यांच्या आंतरराष्ट्रीय विस्तारामुळे फायदा झाला आहे. एडेलवाईस फंडाचे अध्यक्ष आणि सीआयओ (इक्विटीज) त्रिदीप भट्टाचार्य यांनी सांगितले की, आमच्या जागतिक पोर्टफोलिओची मांडणी हे टेक फंडाच्या सरस कामगिरीचे महत्त्वाचे कारण ठरले आहे. गेल्या दोन वर्षांत आम्ही कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान चक्राच्या विकासाला अनुसरून अमेरिकन तंत्रज्ञान क्षेत्रात धोरणात्मकरीत्या २० ते ३० टक्के अतिरिक्त गुंतवणूक कायम ठेवली. यामुळे आम्हाला अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांमधील 'एआय'वरील खर्चात झालेल्या वाढीचा प्रभावी लाभ घेता आला. तसेच, भारतीय आयटी क्षेत्रातील बदलांचे व्यवस्थापन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यास मदत झाली.

**भविष्यातील वाटचाल**

बाजारातील घसरणीमुळे समभागांचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) आता रास्त झाले आहे. अशा स्थितीत तंत्रज्ञान फंडांमध्ये आयटी समभागांचे वजन (वेटेज) वाढू शकते. जैन यांच्या मते, आकर्षक मूल्यांकनामुळे आयटी समभागांमधील गुंतवणूक वाढवली जाऊ शकते, मात्र फंडाची मूळ रणनीती बदलणार नाही.

सध्या भारतीय आयटी समभागांवर दबाव कायम आहे. 'एआय'मधील वेगवान प्रगतीमुळे या क्षेत्रातील पारंपारिक आणि मनुष्यबळावर आधारित व्यवसाय मॉडेलमध्ये अडथळे येऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. जागतिक ग्राहकांनी तंत्रज्ञानावरील अवांतर खर्चात (डिस्क्रीशनरी स्पेंडिंग) कपात केल्याने बाजारातील गुंतवणूकदारांचा उत्साह मावळला आहे.

मोतीलाल ओसवाल एएमसीने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, 'एआय'चा प्रभाव कोडिंगसारख्या खालच्या स्तरावरील तांत्रिक नोकऱ्यांवर त्वरित दिसून येईल. मात्र, हा भाग भारतीय आयटीच्या एकूण कामाचा छोटा हिस्सा आहे. येणाऱ्या काळात ग्राहक कंपन्यांकडे अधिक सवलतींची मागणी करू शकतात. भारतीय आयटी कंपन्या स्वतःच्या 'एआय' साधनांचा वापर करून याला उत्तर देऊ शकतात, ज्यामुळे मजुरीचा खर्च कमी होईल आणि काही लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवला जाईल. मात्र, यामुळे नफ्याचे प्रमाण (प्रॉफिट मार्जिन) एका मर्यादित कक्षेतच राहण्याची शक्यता आहे.

## सायबर फसवणुकीतील 'गोल्डन अवर'

आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार अत्यंत वेगाने वाढत आहेत. युनिफाइड पेमटस् इंटरफेस (यूपीआय), नेट बँकिंग, बनावट लिंक किंवा संशयास्पद फोन कॉलच्या माध्यमातून सर्वसामान्यांना लक्ष्य केले जात आहे. मात्र, अशा प्रकारची फसवणूक झाल्या झाल्या जर तातडीने योग्य पावले उचलली, तर गमावलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते.



**काय आहे हा 'गोल्डन अवर'?**

'गोल्डन अवर' म्हणजे फसवणूक झाल्यानंतरचा तो पहिला अत्यंत महत्त्वाचा तास. या काळामध्ये सायबर भामटे तुमची रक्कम लपवण्यासाठी ती वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वळवण्याचा प्रयत्न करत असतात. जर तुम्ही याच एका तासाच्या आत तक्रार नोंदवली, तर पोलीस आणि बँक प्रशासन त्या गुन्हेगारांचे खाते गोठवू शकतात, ज्यामुळे पैशांचा पुढील प्रवास थांबवता येतो. अनेक प्रकरणांमध्ये, वेळीच सतर्कता दाखवल्यामुळे नागरिकांना ५० ते ७५ टक्क्यांपर्यंतची रक्कम परत मिळाली आहे.

**स्टेट बँक ऑफ इंडियाचा सावधानतेचा इशारा**

भारतीय स्टेट बँक (एसबीआय) सध्या या विषयावर व्यापक जनजागृती मोहीम राबवत आहे. बँकेने 'गोल्डन अवर'चे महत्त्व अधोरेखित करताना स्पष्ट केले आहे की, फसवणुकीची शंका येताच क्षणाचाही विलंब न लावता कारवाई करा. घड्याळाचा काटा तुमच्या विरोधात फिरत असतो, त्यामुळे वेळ वाया घालवणे महागात पडू शकते.

**फसवणूक झाल्यास काय करावे?**

अशा परिस्थितीत सर्वात आधी संबंधित फसवणूक करणाऱ्या व्यक्तीचा क्रमांक अवरोधित (ब्लॉक) करावा आणि आपली कोणतीही गोपनीय माहिती देऊ नये. त्यानंतर आपल्या बँकेच्या साहाय्यता केंद्राशी (हेल्पलाइन) संपर्क साधून खाते आणि कार्ड त्वरित बंद करून घ्यावे. झालेल्या व्यवहाराचा तपशील बँकेला देऊन आपला पासवर्ड बदलावा आणि 'टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन' कार्यान्वित करावे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, राष्ट्रीय सायबर गुन्हे साहाय्यता क्रमांक १९३० वर त्वरित संपर्क साधावा. ही सेवा २४ तास उपलब्ध असते. याशिवाय, व्यवहार ओळख क्रमांक (ट्रान्झॅक्शन आयडी), यूपीआय आयडी आणि फसवणूक करणाऱ्याच्या क्रमांकाचे स्क्रीनशॉट घेऊन सायबर क्राईमच्या वेबसाईटवर ऑनलाईन तक्रार नोंदवावी. आवश्यक वाटल्यास स्थानिक सायबर पोलीस ठाण्यात प्रथम खबरीत अहवाल (एफआयआर) दाखल करावा.

**या वेळेचे महत्त्व का आहे?**

फसवणूक करणारे लोक चोरीचे पैसे 'म्युल अकाउंट्स' म्हणजेच इतर लोकांच्या खात्यात पाठवतात आणि त्यानंतर ते रोखीत किंवा क्रिप्टो करन्सीमध्ये रूपांतरित करतात. जर 'गोल्डन अवर'मध्ये तक्रार प्राप्त झाली, तर बँक आणि पोलीस या निधीचा माग काढून तो गोठवू शकतात. थोडाही उशीर झाल्यास पैसे कायमचे गायब होण्याची भीती असते. त्यामुळेच, सरकार आणि बँकांकडून सातत्याने आवाहन केले जात आहे की, आपला ओटीपी, पासवर्ड किंवा कार्डचा तपशील कोणाशीही सामायिक करू नका आणि अनोळखी ॲप्स डाउनलोड करणे टाळा. लक्षात ठेवा, जितकी लवकर कारवाई, तितके कमी नुकसान.

## वरदान 'पे-लेटर' सुविधेचे

नोकरी सुटणे, व्यवसायात आलेली मंदी किंवा पगाराला होणारा विलंब अशा अनपेक्षित आर्थिक संकटांमुळे अनेकदा सर्वसामान्यांचे बजेट कोलमडते. अशा वेळी घरखर्चाला प्राधान्य देताना आयुर्विम्याचा हप्ता भरण्याकडे दुर्लक्ष होते किंवा तो थकला जातो. मात्र, एकही हप्ता चुकला तर विमा संरक्षण संपुष्टात येण्याची (लॅप्स) भीती असते. हीच जोखीम ओळखून आता विमा क्षेत्रातील कंपन्यांनी 'पे-लेटर' (नंतर पैसे भरा) ही महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामुळे खिशात पैसे नसतानाही तुमचे विमा कवच सुरक्षित राहणार आहे.




पॉलिसी बंद झाली की ती पुन्हा सुरू करण्यासाठी वैद्यकीय तपासणी, वाढीव प्रीमियम किंवा जमा झालेल्या लाभांवर पाणी सोडावे लागण्याची शक्यता असते. पे-लेटर सुविधा म्हणजे प्रीमियम माफ करणे नव्हे, तर तो भरण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळवणे होय. यामुळे आर्थिक ओढाताणीच्या काळातही संरक्षण कवच अबाधित राहते.

**'पे-लेटर' सुविधेची वैशिष्ट्ये :** निश्चित कालावधी: या सुविधेअंतर्गत पॉलिसीधारक आपला प्रीमियम साधारणपणे १२ महिन्यांपर्यंत लांबणीवर टाकू शकतो.

विमा दाव्यावर परिणाम नाही: जर प्रीमियम थकवलेल्या काळात दुर्दैवी घटना घडली आणि विम्याचा दावा (क्लेम) करावा लागला, तर कंपनी प्रलंबित प्रीमियमची रक्कम कापून उर्वरित विम्याची रक्कम वारसदाराला प्रदान करते.

अतिरिक्त शुल्क नाही: या सुविधेसाठी कोणतेही अतिरिक्त व्याज किंवा शुल्क आकारले जात नाही.

**नियम आणि अटी:** ही सुविधा आकर्षक असली तरी त्यासाठी काही निकष पाळणे अनिवार्य आहे:

**१. कालावधी:** पॉलिसी सुरू होऊन किमान तीन वर्षे पूर्ण झालेली असावीत आणि त्या काळातील सर्व हप्ते वेळेवर भरलेले असावेत. **२. मर्यादा:** एकदा ही सुविधा घेतल्यावर, पुन्हा ती वापरण्यासाठी किमान पाच वर्षांचे अंतर असणे आवश्यक आहे. **३. सूचना:** ही सवलत घेण्यापूर्वी पॉलिसीधारकाने विमा कंपनीला आगाऊ कल्पना देणे गरजेचे आहे. **४. पॉलिसीचा प्रकार:** ही सुविधा प्रामुख्याने 'टर्म प्लॅन'साठी उपलब्ध असून, एकरकमी (सिंगल पे) प्रीमियम भरणाऱ्या पॉलिसींना ती लागू होत नाही.

**सवलत संपल्यावर काय?**


दिलेली मुदत संपल्यानंतर पॉलिसीधारकाला थकलेला सर्व प्रीमियम आणि पुढील येणारा हप्ता एकत्रित भरावा लागतो. जर या काळातही पैसे भरले नाहीत, तर मात्र पॉलिसी बंद होऊ शकते किंवा ती 'पेड-अप' स्थितीत जाऊ शकते.

## क्रेडिट कार्डचे बिल वेळेवर भरूनही 'सिबिल' स्कोअर का घसरतो?

अनेक क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांचा असा समज असतो की, केवळ वेळेवर बिल भरल्याने पतमानांकन (क्रेडिट स्कोअर) उत्तम राहते. मात्र, ताज्या आकडेवारीनुसार आणि तज्ज्ञांच्या मते, तुमच्या क्रेडिट कार्डच्या मर्यादेचा (लिमिट) किती वापर करता, यावरही तुमचा आर्थिक दर्जा ठरतो. जर तुम्ही तुमच्या मर्यादेचा वारंवार ८० ते ९० टक्के वापर करत असाल, तर तुम्ही कर्जाच्या पैशांवर अतिप्रमाणात अवलंबून आहात, असा निष्कर्ष बँका काढतात.

तुमच्या कार्डची एकूण मर्यादा जर १ लाख रुपये असेल आणि तुम्ही त्यातील ३० ते ४० हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च करत असाल, तर तुमचा 'युटिलायझेशन रेशो' वाढतो. तज्ज्ञांच्या मते, हा रेशो ३० टक्क्यांच्या खाली राखणे हिताचे असते. एकदा का हा आकडा ४० टक्क्यांच्या पुढे गेला की, त्याचा थेट नकारात्मक परिणाम तुमच्या क्रेडिट स्कोअरवर होऊ लागतो.

बँका तुमच्या व्यवहारांची माहिती एका ठराविक तारखेला (स्टेटमेंट डेट) क्रेडिट ब्युरोला पाठवतात. जर त्या तारखेला तुमच्या कार्डचा वापर मर्यादेपेक्षा जास्त दिसत असेल, तर तुम्ही बिल नंतर वेळेवर भरले तरीही ब्युरोच्या रेकॉर्डमध्ये तुमचा वापर 'जास्त' म्हणून नोंदवला जातो. यामुळे तुमची आर्थिक शिस्त बिघडल्याचे चित्र निर्माण होते.




**काय करावे?**

वापरावर नियंत्रण: तुमचा एकूण वापर मर्यादेच्या ३० टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न करा. मुदतीपूर्वी भरणा: जर तुम्हाला मोठा खर्च करावा लागलाच, तर स्टेटमेंट तयार होण्यापूर्वी काही रकमेचा भरणा करा, जेणेकरून ब्युरोला जाणारा आकडा कमी असेल. मर्यादा वाढवून घेणे: बँकेला विनंती करून कार्डची मर्यादा वाढवून घ्या, ज्यामुळे तुमचा खर्चाचा आकडा स्थिर राहून वापराचे प्रमाण (टक्केवारी) कमी दिसेल. थोडक्यात सांगायचे तर, केवळ बिल भरणे पुरेसे नाही, तर खर्चाचे नियोजन आणि संयम हेच खऱ्या अर्थाने तुमचा क्रेडिट स्कोअर सुरक्षित ठेवू शकतात.

## गृहकर्ज विमा घेताना पैशांची बचत कशी कराल?

स्वप्नातले घर साकारण्यासाठी घेतलेल्या गृहकर्जाला सुरक्षिततेसाठी विम्याचे कवच द्यावे लागते. बरेचदा या होम लोन इन्शुरन्ससाठी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून मोठी रक्कम वसूल केली जाते. याऐवजी ऑनलाईन गृहकर्ज विमा घेतल्यास जवळपास ७० टक्क्यांपर्यंत बचत होऊ शकते.

बँकांकडून दिल्या जाणाऱ्या विम्याच्या प्रीमियमचे दरही चढे असतात आणि विम्याच्या अटीही कडक असतात, ज्यामुळे ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

ऑनलाईन आणि ऑफलाइन प्रीमियममधील फरकाचे मुख्य कारण म्हणजे वितरण व्यवस्था होय. ऑनलाईन प्रक्रियेत मध्यस्थ, एजंटचे कमिशन आणि कागदी कामाचा खर्च वाचतो. विमा कंपन्या या बचतीचा थेट फायदा कमी प्रीमियमच्या स्वरूपात ग्राहकांना देतात.

ऑनलाईन विमा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचत असल्याने तो अधिक स्वस्त आणि पारदर्शक असतो. उदाहरणार्थ, एका ३० वर्षीय व्यक्तीने १ कोटी रुपयांचे विमा संरक्षण २० वर्षांच्या कालावधीसाठी निश्चित केले आहे, तर त्याचे आर्थिक गणित पूर्णपणे बदलून जाते.

पारंपारिक ऑफलाइन पद्धतीमध्ये, म्हणजेच बँक किंवा एजंटमार्फत विमा घेतल्यास, त्यावर १८% वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारला जातो. यामुळे या व्यक्तीला दरमहा २,४९२ रुपये इतका मोठा मासिक प्रीमियम भरावा लागतो. परिणामी, २० वर्षांच्या संपूर्ण कालखंडात या विम्यासाठी एकूण खर्च ५,९८,२४९ रुपये इतका होतो.

याउलट, ऑनलाईन म्हणजेच थेट विमा कंपनीकडून पॉलिसी घेतल्यास, वैयक्तिक पॉलिसींवरील सवलतीमुळे जीएसटीचे प्रमाण ०% असते. यामुळे मासिक प्रीमियमचा बोजा थेट ७२९ रुपयांपर्यंत खाली येतो. संपूर्ण २० वर्षांच्या कालावधीचा विचार केला, तर ऑनलाईन विम्यासाठी एकूण फक्त १,६५,२०० रुपये खर्च करावे लागतात.



ऑनलाईन प्लॅटफॉर्म थेट वैयक्तिक पॉलिसी देतात, तर बँकांचे प्लॅन अनेकदा 'ग्रुप इन्शुरन्स' अंतर्गत येतात, ज्यावर अजूनही कर लागू होऊ शकतो. ऑनलाइन विम्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे दाव्याची रक्कम (क्लेम) थेट बँकेला न मिळता वारसदाराला मिळते. यामुळे कुटुंबाला कठीण काळात निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळते. त्यांना आधी कर्ज फेडायचे आहे की मुलांच्या शिक्षणावर खर्च करायचा आहे, हे ते स्वतः ठरवू शकतात. यामुळे कागदोपत्री कटकटी कमी होऊन आर्थिक आधार लवकर मिळतो.

**कर्ज मुदतीपूर्वी संपल्यास काय?**

जर गृहकर्ज ठरलेल्या मुदतीआधीच फेडले, तर ऑनलाइन विमा पॉलिसी बंद करता येते किंवा ती 'टर्म प्लॅन'मध्ये रूपांतरित करून कुटुंबाचे संरक्षण सुरू ठेवता येते. काही प्रक्रियांमध्ये विम्याच्या उर्वरित कालावधीचा काही पैसा परत मिळण्याचीही सोय असते.

**हेही लक्षात ठेवा**

विमा निवडताना प्रीमियम आपल्या आर्थिक क्षमतेनुसार असावा आणि तो कर्जाच्या रकमेच्या तुलनेत प्रमाणाबाहेर नसावा. विम्याचा कालावधी कर्जाच्या कालावधीइतकाच असावा. यामध्ये अपंगत्व किंवा गंभीर आजारांसारखे अतिरिक्त फायदे (रायडर्स) आहेत का, याची खात्री करावी. क्लेम सेटलमेंट रेशो ज्या कंपनीचे दावा निपटारा प्रमाण ९५ टक्क्यांहून अधिक आहे, अशाच विश्वासार्ह कंपनीची निवड करावी.

## टॅक्स वाचवण्यासाठी महत्त्वाचे भत्ते

इनकम टॅक्स वाचवण्यासाठी पगारातील काही खास भत्ते खूप मदत करतात. नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी तुम्ही तुमच्या कंपनीच्या एचआरशी बोलून तुमच्या पगारामध्ये हे बदल करून घेऊ शकता.

**१. प्रवास किंवा कन्व्हेयन्स अलाउन्स :** घरून ऑफिसला येण्या-जाण्याचा खर्च भागवण्यासाठी हा भत्ता दिला जातो. अनेक कंपन्या हा भत्ता पगारात समाविष्ट करतात, ज्यामुळे टॅक्स वाचतो.

**२. फूड कूपन किंवा एंटरटेनमेंट अलाउन्स :** जेवणाचे कूपन किंवा मील व्हाउचर (उदा. सोडेक्सो) द्वारे टॅक्स वाचवता येतो. अनेक कंपन्या दरमहा ठराविक रक्कम यासाठी देतात. खाण्याचे बिल दाखवल्यास ही रक्कम टॅक्स फ्री मिळते.

**३. कार मेंटेनन्स अलाउन्स :** काही कंपन्या कर्मचाऱ्यांना कारच्या देखभालीसाठी भत्ता देतात. यामध्ये पेट्रोल-डिझेल, सर्व्हिसिंग आणि ड्रायव्हरचा पगार यांचा समावेश असू शकतो. या खर्चावर टॅक्स भरावा लागत नाही.

**४. मोबाईल आणि इंटरनेट अलाउन्स :** ऑफिसच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या मोबाईल आणि इंटरनेटच्या बिलाचा परतावा अनेक कंपन्या देतात. बिल सादर केल्यास ही रक्कम टॅक्स फ्री मिळते.

**५. युनिफॉर्म अलाउन्स :** ज्या ठिकाणी युनिफॉर्म सक्तीचा असतो, तिथे तो खरेदी करण्यासाठी आणि त्याच्या देखभालीसाठी कंपन्या भत्ता देतात. या रकमेवर टॅक्स लागत नाही.

**६. मेडिकल अलाउन्स :** कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबाच्या वैद्यकीय उपचारांसाठी हा भत्ता दिला जातो. वैद्यकीय बिले सादर करून यावर टॅक्स सवलत मिळवता येते.




**७. वर्तमानपत्र, मॅगझिन आणि बुक्स अलाउन्स :** कामाशी संबंधित वाचनासाठी (उदा. न्यूजपेपर किंवा पुस्तके) मिळणारा भत्ता पूर्णपणे टॅक्स फ्री असू शकतो. यासाठी तुम्हाला केवळ बिले जमा करावी लागतात.

**महत्त्वाची टीप:** हे सर्व फायदे मिळवण्यासाठी तुमच्याकडे मूळ बिले असणे आवश्यक आहे. तसेच, हे फायदे प्रामुख्याने जुन्या टॅक्स पद्धतीत अधिक लाभदायक ठरतात.

# अक्षय कर्डिले यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; दोषींवर कारवाई करा

**कारवाई न झाल्यास डीएसपी चौकात रास्तारोकोचा इशारा, पोलीस अधीक्षकांना पदाधिकाऱ्यांचे निवेदन**



अक्षय कर्डिले यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. (छाया – लहू दळवी)

नगर – भाजपचे अक्षय कर्डिले यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी संदीप कर्डिले, गोविंद वाघ, रभाजी सुळ, अनिल कराडे, रावसाहेब कर्डिले, दत्ता तापकिरे, संभाजी पालवे, राहुल पानसरे, सागर बनकर, यशवंत पानमळकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, लोकनेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकाली निधनानंतर रिक्त झालेल्या २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांचा सर्वे करण्यात येत आहे. या सर्वेसाठी ७९७१७५३३५२ व ७९७१८३१०६० या मोबाईल क्रमांकांचा वापर करण्यात आला आहे. या क्रमांकांवरून मतदारसंघातील अनेक मतदारांना व्हॉईस कॉल आले होते.

मात्र या दोन्ही क्रमांकांच्या ट्रूकॉलर आयडीवर लोकनेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांच्या नावाने अतिशय आक्षेपार्ह मजकूर टाईप करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे स्वर्गीय कर्डिले यांच्यावर प्रेम करणाऱ्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. हे कृत्य अत्यंत निंदनीय असून यामुळे मतदारसंघातील कार्यकर्ते व नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्यावर प्रेम करणारे आम्ही सर्व कार्यकर्ते या घटनेचा तीव्र निषेध करत आहोत. या प्रकारामागील संबंधित व्यक्तीचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच राहुरी, नगर व पाथर्डी तालुक्यातील गावागावातील वातावरण दूषित होणार नाही यासाठी पोलीस विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी संबंधित प्रकरणाची दखल घेत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पदाधिकाऱ्यांना दिले.

## ऑल कॅप ॲक्टिव्ह एफओएफ : एक फंड, सर्व मार्केट कॅप्स



प्रसाद शेटे

एक सामान्य भारतीय इक्विटी गुंतवणूकदार बहुतांश वेळेस म्युच्युअल फंडांचा असा पोर्टफोलिओ बाळगतो ज्यामध्ये फंडांची संख्या दोन आकड्यांमध्ये असते. असे का? फंडांच्या निवडीसाठी खूप पर्याय असणे हे एक संभाव्य स्पष्टीकरण आहे. आणि सतत यशस्वी फंडांमागे जाण्याची प्रवृत्ती हे दुसरे कारण आहे.

इक्विटी फंडाची निवड करताना, गुंतवणूकदारांना लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप, मल्टी कॅप, फ्लेक्सी कॅप, फोकस्ड फंड आणि इतर अनेकांमधून एकाची निवड करावी लागते. या असंख्य पर्यायांमुळे, अनेक गुंतवणूकदार एकाच दृष्टिकोनाचा अवलंब करणे टाळावे, यासाठी बहुतांश वेळेस अनेक फंड जवळ बाळगतात. शिवाय, कोणत्याही वेळी, प्रचलित बाजार परिस्थितीनुसार, यापैकी काही श्रेणी इतरांपेक्षा चांगली कामगिरी करत असतात. त्यामुळे गुंतवणूकदार सध्या चांगली कामगिरी करत असलेल्या विभागांमधील निधीची भर घालण्यास प्रवृत्त होतात.

सर्व मोठ्या, मध्यम आणि लहान कॅप विभागांमध्ये सक्रिय व्यवस्थापन असलेल्या इक्विटी योजनांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या फंड ऑफ फंड्समध्ये गुंतवणूक करणे हा त्यावरील एक मार्ग होय. हे फंड वेगवेगळ्या बाजार विभागांच्या तुलनात्मक आकर्षकतेनुसार अंतर्निहित इक्विटी फंडांमध्ये गुंतवणूक करतात, त्यामुळे ते वन-स्टॉप इक्विटी सोल्यूशन ठरू शकतात. या दृष्टिकोनामुळे पोर्टफोलिओचे व्यवस्थापन सुलभ होऊ शकते कारण कारण गुंतवणूकदारांना अनेक योजनांऐवजी फक्त एक एनएव्ही ट्रॅक करावा लागतो. त्याच वेळी, त्यातून एकाच फंडाद्वारे पुरेसे वैविध्य प्राप्त होऊ शकते आणि पोर्टफोलिओची फलनिष्पत्ती दीर्घकालीन दृष्टीने सुधारणा होऊ शकते.

या दृष्टिकोनाचा विचार करणाऱ्या गुंतवणूकदारांना आयसीआयसीआय प्रुडेन्शियल डायव्हर्सिफाइड इक्विटी ऑल कॅप ॲक्टिव्ह एफओएफ आकर्षक वाटू शकतो. ही योजना बाजारातील परिस्थितीनुसार गतिशीलतेने वितरणाचे समायोजन करण्यासाठी सुरचित अंतर्गत (इन-हाऊस) फ्रेमवर्कचा वापर करते आणि सर्व मार्केट कॅपमधील सक्रिय व्यवस्थापन करणाऱ्या इक्विटी फंडांमध्ये प्रवेश मिळवून देते. याची नवीन फंड ऑफर (एनएफओ) १६ मार्च २०२६ पर्यंत खुली आहे. सध्या भारतात असे सक्रिय व्यवस्थापन असलेले एफओएफ अगदी मोजके आहेत.

## सीए परीक्षेत श्रद्धा व्यापारी उत्तीर्ण



नगर – इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया (ICAI) यांच्या जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत अहिल्यानगर येथील श्रद्धा राजेंद्र व्यापारी यांनी यश संपादन करत परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

श्रद्धा या अहिल्यानगर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र व्यापारी यांची कन्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीयांसह मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या यशासाठी त्यांना सीए राजेंद्र काळे आणि सीए पुनीत व्होरा यांचे मार्गदर्शन लाभले.

## रिक्षा चालकावर चाकूने जीवघेणा हल्ला

नगर – सावेडी उपनगरातील पिंपळगाव माळवी रस्त्यावर प्रवाशांची ने-आण करणाऱ्या एका रिक्षा चालकावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वडगावगुप्ता ते डेंटल कॉलेज दरम्यान रिक्षा चालवण्यावरून वाद झाल्याने ही मारहाण करण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत दीपक शंकर बोरसे (वय ३१, रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास आपली रिक्षा घेऊन जात होते. यावेळी आरोपी अमित विजय शिंदे आणि सुमित अशोक शिंदे (दोघे रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) यांनी त्यांना अडवले. 'आमच्या मार्गावर रिक्षा चालवायची नाही' अशी दमदाटी करत दोन्ही आरोपींनी दीपक यांना शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर अमित शिंदे याने त्याच्याकडील धारदार चाकूने दीपक यांच्या डाव्या हातावर आणि खांद्यावर वार करून त्यांना जखमी केले.

जखमी दीपक बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

# इराणवरील अमेरिका-इस्रायल हल्ल्याच्या निषेधार्थ शहरात निदर्शने

**मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर घोषणाबाजी; केंद्र सरकारने युद्धखोर धोरण बदलावे; अमेरिकेच्या युद्धखोर भूमिकेला विरोध**




इराणवरील अमेरिका-इस्रायल हल्ल्याच्या निषेधार्थ मार्केट यार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर भाकपतर्फे निदर्शने करण्यात आली.

नगर – इराणवर अमेरिका व इस्रायलने केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने शहरातील मार्केट यार्ड चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी घोषणाबाजी करत साम्राज्यवादी धोरणांचा निषेध केला. तसेच अमेरिकेच्या युद्धखोर भूमिकेला विरोध करत भारताने ठोस व स्वतंत्र भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. अर्शद शेख, सतीश पवार, फिरोज शेख, शेख अब्दुल गणी, गंगाधर त्र्यंबके, रामभाऊ लांडे, भागचंद उकिरडे, बबनराव पवार आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलकांनी फलक हातात घेऊन घोषणाबाजी करत अमेरिका-इस्रायलच्या कारवाईचा निषेध व्यक्त केला. तर देशाला युद्ध आणि आर्थिक संकटाच्या दिशेने नेणारे धोरण नागरिक, शेतकरी आणि कामगार सहन करणार नाहीत, असा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला.

इराण हा अनेक शतकांपासून भारताशी विविध प्रकारचे सांस्कृतिक, व्यापारी व आर्थिक संबंध राखणारा देश आहे. भारत-इराण ऊर्जा कॉरिडॉर आणि गॅस पाइपलाइन प्रकल्प अमेरिकेच्या दबावामुळे भारताने सोडून दिला. तसेच चाबहार बंदर प्रकल्पावरही अमेरिकेच्या दबावाचा परिणाम झाला, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. काश्मीर प्रश्नावर संयुक्त राष्ट्रसंघात इराणने भारताला मदतकारक भूमिका घेतली असल्याचेही त्यांनी नमूद केले. याचबरोबर I2U2 आणि QUAD सारख्या लष्करी व धोरणात्मक युतींमध्ये सहभागी होऊन भारताला अमेरिकेच्या गोटात ढकलण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका करण्यात आली.

युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांमध्ये काम करणाऱ्या सुमारे ९५ लाख भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या नागरिकांच्या कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी केंद्र सरकारने गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

इराण-इस्रायल संघर्षामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. होरमुझच्या आखातातील तणावामुळे तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाल्यास भारतावर परकीय चलनाचा मोठा बोजा पडतो, असे सांगत केंद्र सरकारने पर्यायी धोरण अवलंबावे, अशी मागणी करण्यात आली.

युद्धामुळे बासमती तांदूळ, साखर, कांदा, केळी, द्राक्षे यांसारख्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीवरही परिणाम झाला असून त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. निर्यात बंद झाल्याने झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकरी आणि लघुउद्योगांना द्यावी, अशी मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने केंद्र सरकारसमोर काही प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये इराणवरील हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध नोंदवावा, संयुक्त राष्ट्रसंघात कारवाईची मागणी करावी, I2U2 आणि QUAD सारख्या युतीतून बाहेर पडावे, ओमानमधील दुकम बंदरासह भारतीय पायाभूत सुविधांचा वापर युद्धासाठी करू देऊ नये, तसेच रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल आयात करून इंधनदर कमी करावेत, अशा मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय निर्यात बंद झाल्यामुळे झालेल्या सुमारे ५० हजार कोटी रुपयांच्या नुकसानीची भरपाई शेतकरी आणि लघुउद्योगांना देण्याचीही मागणी करण्यात आली. या सर्व मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले.



कोहिनूर मंगल कार्यालयासमोरील मोकळ्या प्लॉटमध्ये आग लागल्याची घटना घडली. सर्वात प्रथम माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी प्रसंगावधान दाखवत अग्निशामक दलाला फोन करून घटनेची माहिती दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे अग्निशामक दल वेळेत घटनास्थळी पोहोचले आणि आग आटोक्यात आणली. शेजारीच मोठ्या इमारती असल्यामुळे मोठी हानी होण्याची शक्यता होती, मात्र वेळीच कारवाई झाल्याने संभाव्य दुर्घटना टळली. कोहिनूर मंगल कार्यालयासमोरील मोकळ्या प्लॉटमध्ये आग मनसुख वाबळे यांच्या सतर्कतेने टळली.

## वेश्या व्यवसायाला विरोध केल्याने तरुणांना मारहाण; २० हजारांची केली लूट, आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तीसी परिसरात वेश्या व्यवसायाला विरोध केल्याच्या कारणावरून तरुणांना अडवून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच, त्यांच्या खिशातील २० हजार रुपये बळजबरीने काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर नागदेव जगदाळे (रा.रुईछत्तीसी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या साथीदारांसह जात असताना आरोपींनी त्यांची गाडी अडवून त्यांना खाली ओढले. गणेश देवराम छत्तीसे, प्रशांत देवराम छत्तीसे, निर्मला देवराम छत्तीसे, शोभा दिलीप गोरे, अभिजीत दिलीप गोरे, दिलीप दत्तात्रय गोरे, जुबेर नसीर शेख आणि गणेश उर्फ भैय्या संपत गोरे (सर्व रा. रुईछत्तीसी) यांनी संगनमताने हे कृत्य केले. यावेळी आरोपींनी फिर्यादीला व त्यांच्या साथीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली.

प्रशांत छत्तीसे याने हातातील दांडक्याने मारहाण करत फिर्यादीच्या खिशातील २० हजार रुपये बळजबरीने काढून घेतले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिस असलेल्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

नगर – पोलिस दलात ठाणे येथे कार्यरत असलेल्या एका २६ वर्षीय तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून, तिला लग्नाचे आमिष दाखवत तसेच तिचे खाजगी फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर प्रसारित करण्याची धमकी देऊन नगर दौंड रोडवरील एका लॉज मध्ये वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आरोपी रणजित मुकिंदा चव्हाण (वय २७, रा.निमजेवाडी, घोटवी, ता.श्रीगोंदा)याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत तरुणीने फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुणीही मुळची नगर जिल्ह्यातील आहे. आरोपी रणजित चव्हाण याने पीडित तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढत तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर मार्च २०१९ पासून ते फेब्रुवारी २०२६ या प्रदीर्घ कालावधीत त्याने पीडितेचे खाजगी फोटो व व्हिडीओ काढून ते सोशल मिडीयावर प्रसारित करण्याची भीती दाखवली. याच धमकावणीचा गैरफायदा घेत, आरोपीने वारंवार तरुणीच्या इच्छेविरुद्ध शारीरिक तिला नगर दौंड रोडवरील बाबुर्डी बेंद शिवारातील एका लॉज वर नेवून अत्याचार केला.

त्याच्या वारंवारच्या धमक्यांना आणि अश्लील भाषेत करण्यात येणाऱ्या शिवीगाळीला कंटाळून अखेर पीडित तरुणीने ८ मार्च रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रणजित मुकिंदा चव्हाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१ (२), ३५२, ६४ (१), ६४ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे पुढील तपास करत आहेत.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांची टोळी पकडली



मढी घाटात सशस्त्र दरोड्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – मढी ते पाथर्डी मार्गावरील मढी घाटात सशस्त्र दरोड्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. या टोळीतील ४ गुन्हेगारांना ताब्यात घेतले असून त्यांचे काही साथीदार अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

जिल्ह्यात दरोडा, घरफोडी आणि रोड रॉबरीसारख्या गंभीर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला नियमित गस्त करून प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विजय पवार, बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ व चालक चंद्रकांत कुसळकर यांचे पथक तयार करून गस्तीसाठी रवाना केले होते.


सदर पथक ७ मार्च रोजी पाथर्डी पोलीस ठाणे हद्दीत मढी यात्रेच्या बंदोबस्तादरम्यान पथक गस्त करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, आकाश मोहन डुकरे व विकास दत्तू म्हस्के हे त्यांच्या अन्य साथीदारांसह मढी ते पाथर्डी मार्गावरील मढी घाटात थांबून सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्या वेळी रस्त्याच्या कडेला अंधारात काही इसम हातात हत्यारे घेऊन संशयास्पदरीत्या उभे असल्याचे आढळून आले. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले, तर इतर काही जण पळून गेले.

आकाश मोहन डुकरे (वय २६, रा. विजयनगर, पाथर्डी), विकास उर्फ सुनील दत्तू म्हस्के (वय २५, रा. माणिक दौंडी चौक, पाथर्डी), आदित्य दीपक बोरकर (वय २३, रा. तनपुरे गल्ली, राहुरी) आणि शरद श्रीरंग जाधव (वय ४०, रा. वागल खेडा, ता. अंबड, जि. जालना) अशी पकडलेल्या चौघांची नावे आहेत. त्यांच्याविरूध्द पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या ताब्यातून तीन मोबाईल व एक स्क्रू ड्रायव्हर असा सुमारे १२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, या टोळीतील प्रमुख आकाश डुकरे याच्याविरूध्द अहिल्यानगर, पुणे आणि सातारा जिल्ह्यात खून, दरोडा, खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. तसेच विकास म्हस्के व आदित्य बोरकर यांच्याविरूध्दही विविध पोलीस ठाण्यांत दरोडा व चोरीसंबंधी गुन्हे नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# शहरातील महिला भगिनींसाठी सुसज्ज आणि स्वच्छ स्वच्छतागृहे उभारण्याची मागणी

**महिलांच्या स्वच्छतागृहांचा प्रश्न प्राधान्याने सोडवणार : महापौर ज्योतीताई गाडे यांचे आश्वासन**



शिवाजीराव साळवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेऊन शहरातील विविध भागांतील महिलांच्या स्वच्छतागृहाच्या अडचणी मांडल्या.

नगर – जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शहरातील महिला भगिनींसाठी सुसज्ज आणि स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारण्याची मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाने महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीची तातडीने दखल घेत, महिलांच्या आरोग्याशी निगडित असलेला हा प्रश्न आपण प्राधान्याने मार्गी लावू, असे आश्वासन महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांनी शिष्टमंडळाला दिले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेऊन शहरातील विविध भागांतील महिलांच्या स्वच्छतागृहाच्या अडचणी मांडल्या. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, जिल्हा सचिव माणिकराव नवसुपे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर म्हैसमाळे, जिल्हा सहसचिव सिकंदर वाकरे आणि शहर अध्यक्ष अतुल देव्हारे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

महापौर गाडे यांनी शहरातील महिला भगिनींना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. विशेषतः सावेडी, पाईपलाईन रोड आणि गुलमोहर रोड यांसारख्या वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छतागृहांची सोय करण्याबाबत त्यांनी सकारात्मकता दर्शवली. तसेच स्वच्छतागृह उभारल्यानंतर त्याचा मेंटेनन्स व्यवस्थित ठेवण्याबाबत सूचनाही दिल्या.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शहरात कामानिमित्त किंवा व्यायामासाठी बाहेर पडणाऱ्या महिलांना स्वच्छतागृहांच्या अभावामुळे प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. तासनतास नैसर्गिक विधी रोखून धरल्याने युरिन इन्फेक्शन (UTI) सारखे गंभीर आजार जडण्याची भीती निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून शहरात 'पिंक टॉयलेट्स' (Pink Toilets) ही संकल्पना राबवून तिथे सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीनची सोय करावी, अशी आग्रही मागणी शिवाजीराव साळवे यांनी केली.

## लग्नाच्या वरातीमध्ये रात्री उशिरापर्यंत 'डीजे; नवरदेवासह चालकावर केला गुन्हा दाखल

नगर – शहरातील बोल्हेगाव परिसरात रात्रीच्या वेळी नियमांची पायमल्ली करून डीजे चा दणदणाट करणे नवरदेवासह चालकाला अंगलट आले आहे. जिल्हादंडाधिकारी यांचे आदेश झुगारून वरात काढल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात पहिल्यांदाच थेट नवरदेवासह डीजे चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस नाईक रवींद्र तुकाराम धुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ मार्च रोजी रात्री बोल्हेगाव येथील आंबेडकर चौकात नवरदेव सोनु उर्फ संदेश राजेंद्र गायकवाड याची वरात निघाली होती. यावेळी मर्यादेपेक्षा मोठ्या आवाजात डीजे सुरू असल्याने ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवले गेले. गस्त घालणाऱ्या पोलिस पथकाने डीजे बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, नवरदेव सोनु उर्फ संदेश राजेंद्र गायकवाड (रा. रेणुकानगर, बोल्हेगाव) आणि डीजे चालक गणेश बाळासाहेब कोलते (रा. बोल्हेगाव) यांनी पोलिसांच्या सूचनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.ध्वनी तीव्रता मोजमाप यंत्राद्वारे तपासणी केली असता आवाजाची पातळी ८२.४ डेसिबल इतकी आढळून आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि जिल्हादंडाधिकारी यांच्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता व पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

